cmyk

## संपादकीय

### तर देशात गृहयुद्धाचा धोका...

मध्यपूर्वेत सुरू असलेले अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचे चटके आता जागतिक पातळीवर बसण्यास सुरुवात झाली आहे. भारतासारख्या महाकाय देशात याची प्रखरता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. सरकारने काही दिवसांपूर्वीच घरगुती गॅसच्या किमतीत साठ रुपयांनी वाढ केली. त्यानंतर आता केंद्र सरकारने देशभरात 'एस्मा' अर्थात आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायदा लागू केला आहे. त्यामुळे देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध लागणार आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-३१४ | गुरूवार दि.१२ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### दूध संकलन उद्योगांच्या वीजदरात कपात

मुंबई : दूध संकलन उद्योगांसाठी विजेच्या दरात कपात करण्याबाबत राज्य सरकारने केलेली मागणी राज्य वीज नियामक आयोगाने मान्य केली आहे. येत्या १ जुलैपासून नवे दर लागू होणार असून वीज दरात मोठी कपात करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अनिल पाटील यांनी विधानसभेत दूध संकलन केंद्रांच्या वीज दरांबाबतचा प्रश्न मांडला. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की दूध संकलन उद्योग आणि त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या चिलर्स यांना औद्योगिक श्रेणीतील वीजदर आकारला जात होता. या संदर्भात राज्य सरकारने नियामक आयोगासमोर समोर मांडणी केली की दूध संकलन केंद्रांमध्ये चिलर्स अत्यावश्यक असतात. चिलर्सशिवाय दूध संकलन करणे शक्य नाही. त्यामुळे या वापराला स्वतंत्र किंवा विशेष श्रेणीचा दर द्यावा.

### पदोन्नतीमधील आरक्षणाची अंमलबजावणी करा

मुंबई : पदोन्नतीमध्ये आरक्षण हा केवळ धोरणाचा विषय नाही तर तो एक घटनात्मक वचन आहे ज्याचा उद्देश वस्तुनिष्ठ समानता आणि सामाजिक न्याय साध्य करणे आहे. ७७ व्या आणि ८५ व्या घटनादुरुस्ती आणि सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या व्याख्यांद्वारे संसदेचा हेतू प्रतिबिंबित झाला आहे, त्यामुळे सरकारी नोकरीत मागासवर्गीयांचे मूलभूत हक्क आणि प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना सरकारी नोकरीत पदोन्नतीमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करावी अशी मागणी खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे. महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात खासदार वर्षा गायकवाड यांनी ही मागणी केली आहे.

### प्रकाश आंबेडकर यांची इंधन तुटवड्यावरून टीका

मुंबईः पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रात केंद्र सरकारने एस्मा लागू केल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मोदी सरकारच्या ऊर्जा धोरणावर जोरदार टीका केली आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत सर्व काही सुरळीत असल्याचा दावा करणाऱ्या सरकारने अचानक एस्मा लागू केल्याने परिस्थिती गंभीर असल्याचे स्पष्ट होत असल्याचे म्हटले. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, केंद्र सरकार अनेक वर्षांपासून 'आत्मनिर्भरते'चे जुमले देत आहे.

### वरिष्ठ अधिकारी गैरहजर राहिल्यास कारवाई-नार्वेकर

मुंबई : प्रतिनिधी

सभागृहातील अदृष्य गॅलरीत अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा विधानसभेत पुन्हा एकदा गाजला. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी अनुपस्थित असतील तर विधानसभेला कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे असा इशारा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला. अर्थसंकल्प चर्चेदरम्यान अधिका-यांच्या गॅलरीत वरिष्ठ अधिकारी मोठ्या प्रमाणात अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी हा अंतिम इशारा दिला. विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सभागृहात केवळ चार मंत्री उपस्थित होते.

# मराठवाडा, उत्तर महाराष्ट्राला 78 टीएमसी पाणी

## दुष्काळ मुक्तीकडे वाटचाल-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राची दुष्काळमुक्तीकडे वाटचाल अत्यंत चांगल्या पद्धतीने चालली आहे. नदीजोड प्रकल्प वेगाने पुढे जात आहे. विशेषतः मराठवाड्याकरिता जो वरदान ठरेल अशा उल्हास खोऱ्याचे पाणी मराठवाड्यात नेण्याच्या प्रकल्पासंदर्भात पूर्वव्यवहार्यता पडताळणी अहवाल (प्री फिजिब्लिटी रिपोर्ट) आला आहे. यातून ५४ टीएमसी पाणी अपेक्षित होते. पण पूर्वव्यवहार्यता पडताळणी अहवालात ७८ टीएमसी पाणी हे उल्हास खोऱ्यातून मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रात नेता येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ११ मार्च) विधानसभेत दिली.**



### देशाच्या जीडीपीपेक्षा महाराष्ट्राचा जीडीपी जास्त

देशाच्या एकूण जीडीपीपेक्षा महाराष्ट्राचा जीडीपी जास्त आहे. आपण स्थिर किमतीचा विचार केला तर आपण ७.९ टक्के दराने विकसित झालो आहोत. तर चालू किमतीवर १०.४ टक्के दराने विकास झाला आहे. देशाच्या जीडीपीत आपल्या राज्याचा हिस्सा १४.३ टक्के आहे. सर्वाधिक हिस्सा असलेले राज्य महाराष्ट्र आहे. आपण निर्यातीत एक नंबर आहोत. स्टार्टअप, युनिकॉर्न आणि जीएसटी संकलनातही नंबर एक आहोत. वृक्ष आच्छादनातही नंबर एक असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी अर्थसंकल्पावरील चर्चेला विधानसभेत उत्तर दिले. यावेळी त्यांनी अडचणीच्या स्थितीत मार्ग काढण्याची क्षमता महाराष्ट्रात असून आर्थिक शिस्त पाळत अर्थसंकल्प ▶▶ पान २ वर

# एसटी महामंडळात लवकरच महाभरती

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची विधान परिषदेत घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

ग्रामीण भागाची जीवन वाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एसटी महामंडळात लवकरच चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची महाभरती होणार आहे. एसटीमधील एकूण १७ हजार ७४२ रिक्त पदे भरण्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. वित्त विभागाकडून या प्रस्तावाला मान्यता मिळताच भरती प्रक्रिया सुरु केली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी विधान परिषदेत केली.

बुधवारी विधान परिषदेत भाजपच्या श्रीकांत भारतीय यांनी एसटीमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. गेली अनेक वर्षे हे कंत्राटी कर्मचारी काम करीत असून त्यांना एसटीच्या सेवेत कायम करण्याची मागणी भारतीय यांनी केली. या प्रश्नाच्या चर्चेला उत्तर देताना सरनाईक यांनी एसटी महामंडळातील भरतीची माहिती दिली. २०२२ मध्ये एसटी महामंडळाचा ▶▶ पान २ वर

### भरतीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्य

एसटी संपाच्या काळात बस सेवा ठप्प झाल्याने प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्या काळात तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी भरती करण्यात आली होती. संप मिटल्यानंतर नियमित कर्मचारी परत आल्याने कंत्राटी कामगारांना कायम ठेवणे नियमांनुसार शक्य नसते. पण भविष्यात आपल्याला कायम नोकरी मिळेल अशी त्यांना आशा असते. त्यामुळे सरकारकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर भरती प्रक्रियेत कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

## लोकसभा अध्यक्षांविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव फेटाळला



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

लोकसभेत विरोधकांनी लोकसभा अध्यक्षांविरुद्ध आणलेला अविश्वास प्रस्ताव बुधवारी जोरदार गदारोळात फेटाळण्यात आला. पीठासीन अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी हा प्रस्ताव फेटाळल्याची घोषणा केली. दरम्यान, या प्रस्तावावरील चर्चेवेळी गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली, ज्यावरून सभागृहात अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला.

गृहमंत्री अमित शाह भाषणासाठी उभे राहिल्यावर विरोधकांनी घोषणाबाजी करत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. शाह यांच्या वक्तव्याचा निषेध करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी त्यांनी माफी मागावी, अशी मागणी लावून धरली. अध्यक्षांविरुद्धचा अविश्वास ▶▶ पान २ वर

## एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध

### अफवांवर विश्वास ठेवू नका प्रशासनाचे आवाहन





छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही भू-राजकीय परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्याबाबत विविध प्रकारच्या बातम्या प्रसारित होत असल्या तरी नागरिकांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था नियमितपणे सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने दि. ९ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार देशात घरगुती ▶▶ पान २ वर

## परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता ३०० कोटींचा होणार!

### धनंजय मुंडे यांनी केलेली मागणी फडणवीसांनी केली पूर्ण

मुंबई । प्रतिनिधी

परळी येथील पाचवो ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराचा विकासासाठी धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या सुधारित ३०० कोटींच्या प्रस्तावास शिखर समितीच्या माध्यमातून मान्यता देण्यात येणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधानसभेत अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तरादरम्यान जाहीर केले.



प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विविध कामे सुरू आहेत. या आराखड्यातील रक्कमेत वाढ करून या अर्थसंकल्पीय वर्षात वाढीव निधी देण्याची विनंती आ. धनंजय मुंडे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती. अजित दादानी या आराखड्यात वाढ करण्याची सूचना केली होती, असा उल्लेखही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला. दरम्यान या विकास ▶▶ पान २ वर

## खत विक्रीत अनियमितता परवाने निलंबित होणार



मुंबई । प्रतिनिधी

खत विक्रीत अनियमितता आढळल्यास संबंधित विक्रेत्यांचे परवाने १५ दिवसांऐवजी सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

सदस्य राजेश पवार यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री नाना पटोले, ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.११ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२८.०० क्विंटल | २,००० | २,६५० | २,२८० |
| ज्वारी/हायब्रिड: १७१.५० क्विंटल | २,२०० | ४,६२१ | ३,५४४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १७.५० क्विंटल | ७,३९१ | ७,६८० | ७,५५९ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १७.०० क्विंटल | २,४०० | २,९३३ | २,६९० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ११.५० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ४,९५० | ५,३०१ | ५,०९४ |

# हरीश राणा यांना निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय, इच्छामरण देण्याची देशातील पहिलीच वेळ

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि. ११) इच्छामरण प्रकरणावर महत्त्वपूर्ण निर्णय दिला. गेल्या १३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा यांना सर्वोच्च न्यायालयाने पॅसिव्ह यूथनेशिया म्हणजेच उपचार थांबवून मृत्यू पत्करण्याची परवानगी दिली आहे. न्यायालयाच्या आदेशाने अशा प्रकारे इच्छामरण देण्याची ही देशातील पहिलीच वेळ आहे.**

२०१८ मध्ये न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली होती, पण त्यातील काही तांत्रिक बाबी स्पष्ट नव्हत्या. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा संवेदनशील निकाल दिला. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पॅसिव्ह यूथनेशियाला कायदेशीर मान्यता दिली होती, मात्र बुधवारच्या निकालाने त्यातील अनेक तांत्रिक बाबी अधिक स्पष्ट केल्या आहेत. हा निकाल ऐतिहासिक मानला जात आहे



### न्यायालयाने ठेवला होता निकाल राखीव

या प्रकरणी १५ जानेवारी २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात हरीशच्या पालकांनी दाखल केलेल्या पॅसिव्ह यूथनेशिया (निष्क्रिय स्वेच्छामृत्यू) याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली होती. त्यावेळी न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. यावेळी न्यायालयाने स्थापन केलेल्या दोन वैद्यकीय मंडळांनी या रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा अहवाल दिला. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रश्मी नंदकुमार, तर केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी युक्तिवाद मांडला.

कारण त्याने २०१८ च्या मार्गदर्शक तत्त्वांना एक पाऊल पुढे नेले आहे. ज्या रुग्णांचे प्राण केवळ फीडिंग ट्यब (अन्नपुरवठा करणारी नळी) द्वारे व्यतित होत आहे, अशा प्रकरणांमध्ये निष्क्रिय इच्छामरणा प्रक्रिया कशी राबवावी, यावर पूर्वी स्पष्टता नव्हती. आजच्या निकालामुळे हा पेच सुटला आहे. दिल्लीच्या महावीर एन्क्लेव्हचा रहिवासी असलेला हरीश महाविद्यालयीन शिक्षणासाठी चंदीगडला गेला होता. २० ऑगस्ट २०१३ रोजी पेईंग गेस्ट म्हणून राहत असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून तो पडला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या अपघातात त्याला १०० टक्के अपंगत्व आले. तेव्हापासून तो शुद्धीवर आलेला नाही. गेल्या १३ वर्षांपासून हरीश केवळ नळ्यांद्वारे श्वास आणि ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# तर देशात गृहयुद्धाचा धोका...

मध्यपूर्वेत सुरू असलेले अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचे चटके आता जागतिक पातळीवर बसण्यास सुरुवात झाली आहे. भारतासारख्या महाकाय देशात याची प्रखरता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. सरकारने काही दिवसांपूर्वीच घरगुती गॅसच्या किमतीत साठ रुपयांनी वाढ केली. त्यानंतर आता केंद्र सरकारने देशभरात 'एस्मा' अर्थात आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायदा लागू केला आहे. त्यामुळे देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध लागणार आहे.

अकरा दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धामुळे भारताला होणारा खनिज तेल व नैसर्गिक वायूचा पुरवठा मंदावला आहे. त्यातच इराणने होर्मुझ खाडीबरोबरच अल-मानदेब सागरी मार्गालाही बंद करण्याचा इशारा दिला आहे. हा मार्ग लाल महासागराला अडनच्या खाडीशी जोडतो. तसेच भूमध्य सागर आणि हिंद महासागराला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. ही परिस्थिती अशीच राहिल्यास पुढील काही दिवसांत देशात इंधन व गॅसची अभूतपूर्व टंचाई जाणवू शकते. या युद्धामुळे देशात आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी केंद्र सरकारने एस्मा कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. आपत्कालीन काळात आवश्यक सेवा आणि सुविधांचा अखंड पुरवठा व्हावा, हा उद्देश यामागील आहे. दैनंदिन वापरात लागणार्या गोष्टी आणि सेवांचा या कायद्याच्या कार्यकक्षेत समावेश होतो. इराण-इस्त्राईल संघर्षाचा परिणाम भारतात सर्वप्रथम शेती क्षेत्रावर जाणवला. नाशिक जिल्ह्यातील कांदा, जळगाव जिल्ह्यातील केळी व भाजीपाला घेऊन जाणारे अनेक कंटेनर दुबईतील जेबेल अली व मुंबईतील बंदरात अडकून पडले आहेत. त्यातच केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीवर मर्यादा आणल्याने स्थानिक बाजारात साखरेचा साठा वाढून बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. शेतीनंतर छोटे उद्योग धंदे व सर्वसामान्य जनतेवर या युद्धाचे परिणाम जाणवू लागले आहेत. तेल शुद्धीकरण कारखाने आणि पेट्रोकेमिकल कंपन्यांना जास्त प्रमाणात एलपीजी उत्पादन करण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले असले तरी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात व्यावसायिक आणि घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे.

अनेकांनी गॅस सिलिंडर मिळत नसल्यामुळे एजन्सीसमोर रांगा लावण्यास सुरुवात केली आहे. घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी जिल्हा व तालुका पातळीवर दक्षता किंवा फिरते पथक स्थापन करून गॅस वितरकांवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तेल कंपन्यांनीदेखील आपल्या वितरण पद्धतीत बदल करत रुग्णालये व शैक्षणिक संस्थांना एलपीजी गॅसचा प्राधान्याने पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. आधीच गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबईतील २० टक्के हॉटेल्स बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून काही दिवसांत मुंबईतील ५० टक्के हॉटेल्स बंद होण्याची शक्यता असोसिएशन ऑफ हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट संघटनेने व्यक्त केली आहे. गॅसचा पुरवठा लवकर सुरळीत झाला नाही, तर देशातील हॉटेल उद्योगासमोर मोठे संकट उभे राहू शकते. कतारने द्रवीकृत नैसर्गिक वायू अर्थात एलएनजीचे उत्पादन थांबवल्याने महाराष्ट्रातील अनेक छोटे-मोठे उद्योग काही दिवसांत बंद होण्याच्या मार्गावर आहेत. नाशिकमधील सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहतीतील शंभरपेक्षा जास्त कंपन्यांकडे एलएनजी साठा एक दिवस पुरेल एवढाच असल्याचे सांगितले जात आहे. अशीच परिस्थिती अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड येथील उद्योगधंद्यांची आहे. जळगाव येथील ४०० प्लास्टिक उद्योगांना कच्च्या मालाच्या किमतीमध्ये ५० टक्क्यांनी वाढ झाल्याने आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. पुणे शहरातील गॅसवर चालणार्या विद्युत शवदाहिनीदेखील पुढील आदेश येईपर्यंत तात्पुरत्या बंद करण्यात आल्या आहेत.

पिंपरी-चिंचवडमधील पंधरा हजारांपैकी साडेसात हजार कंपन्यांचा गॅसचा साठा संपला आहे. त्यामुळे उत्पादन थेट निम्म्यावर आले आहे. पेट्रोल आणि डिझेल पुरवठ्यावरदेखील या युद्धामुळे परिणाम जाणवू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर दुपटीने वाढले आहेत. सरकार पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार नाही असे सांगत असले तरी भारताला पेट्रोल-डिझेलसाठी आखाती देशांवर अवलंबून राहावे लागते. गॅस व पेट्रोलियम पदार्थ हे भारतीय अर्थव्यवस्था गतिमान ठेवण्याचे मुख्य स्त्रोत आहेत. त्याचा पुरवठा व किमतीचा बाजारावर थेट परिणाम जाणवतो. अशा संकटसमयी साठेबाजदेखील सक्रिय होऊन चढ्या भावाने पेट्रोलियम पदार्थांची विक्री करतात. या सर्व प्रक्रियेत मात्र सामान्यांचे अर्थचक्र बिघडते. मुक्त व्यापार धोरणामुळे अनेक देशांचे अर्थचक्र एकमेकांवर अवलंबून आहे. याचा अनुभव आपण पुन्हा एकदा इस्त्रायल आणि इराण युद्धामुळे घेत आहोत. हे युद्ध त्यांच्या भूमीवर लढले जात असले तरी त्याच्या झळा इतर देशांना सोसाव्या लागत आहेत. यावर लवकर तोडगा न निघाल्यास अनेक देशांत आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण होऊन गृहयुद्धाचा धोका उद्भवू शकतो.

## चकलांबा पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी एपीआय सचिन इंगळे

**बीड । प्रतिनिधी**

**येथील जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांची चकलांबा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्तीचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी निर्गमित केले आहेत.**



चकलांबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे दिनांक ११ मार्च रोजी लाच प्रकरणात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. सचिन इंगळे हे जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली जनसंपर्क अधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियातील सर्वच पत्रकारांशी सौदाह्यपूर्ण आणि जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. शांत, मितभाषी, संयमी आणि कार्यतत्पर अधिकारी म्हणून सुपरीचीत आहेत.







**बीडः पी.म.श्री. जिल्हा परिषद शाळा पाली मध्ये इफ्तार चे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी समस्त पाली ग्रामस्थ, विध्यार्थी, सह शिक्षिका, शिक्षक वर्ग, हा कार्यक्रम शाळेचे मुखध्यापक कांतीलाल लाड यांच्या आयोजनात साजरा करण्यात आला.**

## बन्सीधराव मुंडे इंग्लिश स्कूल व स्वामी विवेकानंद विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील बन्सीधरराव मुंडे इंग्लिश स्कूल व स्वामी विवेकानंद प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या दोन्ही शाळांचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच म ोठ्या उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कला कौशल्यांचा कलाविष्कार दाखवत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी शहराचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप तर उदघाटक आजी आमदार केशवराव आंधळे, उपनगराध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, इंद्रमोहन मुंडे संस्थेचे सचिव श्रीमंत मुंडे, तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये दादासाहेब मुंडे, अनिल चोले, सर्जेराव आळणे, नवनाथ म्हेत्रे, डॉ. मारुती आंधळे, विठ्ठल आंधळे, महादेव उजगरे, गुरुप्रसाद माळवदे, सचिन सानप, अमोल आंधळे, नागेश डिगे, बाबा वाघमारे, अनिल वाघमारे, संतोष मुंडे, रणजीत मुंडे, मेघराज मुंडे, डॉ. सतिश मुंडे, नंदराज मुंडे, धनराज मुंडे, डॉ. अभिजीत मुंडे, प्रा. तोंडे सर सह इतर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सीभाऊ मुंडे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या दर्जेदार सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांनी शेतकरी गीत, पोवाडा, देश भक्तीपर गीते, लावणी आणि समाज प्रबोधनपर नाटिका सादर केल्या. या स्नेहसंमेलनात विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन घडवण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतांना उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित प्रेक्षक व पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. महाराष्ट्रातील पारंपरिक लेझिम व ढोल पथकाने उपस्थितांचे लक्ष वेधले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. बोचरे यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बन्सीधरराव मुंडे इंग्लिश स्कूल व स्वामी विवेकानंद प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## लाच प्रकरणातील सह-आरोपी सुटला तरी लाचखोर अधिकारी निर्दोष ठरणार नाही-सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**लाच घेण्यासाठी कट रचणे आणि प्रत्यक्षात लाच घेणे हे दोन स्वतंत्र गुन्हे आहेत, असे स्पष्ट करत एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने स्वतः लाच मागितली आणि स्वीकारली असेल, तर त्याला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवले जाऊ शकते. भलेही त्याच्यासोबतच्या दुसऱ्या आरोपीवर असलेला 'कट रचल्याचा' आरोप सिद्ध झाला नसेल किंवा तो सह-आरोपी निर्दोष सुटला असेलमुख्य आरोपीला केवळ त्या आधारावर सुटता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत अशा आरोपीला दोषी ठरवले जाऊ शकते, असे स्पष्ट करत राजस्थान उच्च न्यायालयाने आयकर निरीक्षकाला केवळ सह-आरोपी निर्दोष मुक्त झाला असल्याच्या कारणामुळे दोषमुक्त केल्याचा निर्णयही न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने रद्दबातल ठरवला.**

प्राप्तिकर निरीक्षक बलजीत सिंग याने आपल्या वरिष्ठ आयुक्तांच्या नावावर ५ लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार व्यावसायिक पवन अग्रवाल यांनी सीबीआयकडे केली होती. २९ डिसेंबर २०१० रोजी सीबीआयने सापळा रचून बलजीत सिंगला पकडले. त्याच्या खिशातून लाचेचे पैसे जप्त करण्यात आले होते. फिनॉल्फथॅलिन पावडरमुळे त्याचे हातही गुलाबी झाले होते, जे लाच स्वीकारल्याचा ठोस पुरावा होता. या प्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने दोघांनाही दोषी ठरवले. मात्र राजस्थान प्राप्तिकर निरीक्षकाची केवळ या आधारावर सुटका केली होती की, त्याच्यासोबतचा सह-आरोपी निर्दोष सुटला होता. तसेच कलम १२०-बी (कट रचणे) अंतर्गत असलेले आरोप फेटाळले गेले होते. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवत, लाच मागितल्याचे आणि स्वीकारल्याचे पुरावे स्वतंत्रपणे उपलब्ध असतील, तर कटाचा आरोप सिद्ध न झाल्याने मुख्य गुन्हा संपत नाही. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखालील गुन्हा आणि गुन्हेगारी कटाचा आरोप हे दोन वेगळे विषय आहेत, असे स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने प्राप्तिकर निरीक्षक लाचप्रकरणी दोषी असल्याचा निर्णय कायम ठेवला. मात्र, आरोपीचे वय आणि प्रकृती विचारात घेऊन त्याची मूळ ४ वर्षांची शिक्षा कमी करून १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुधारित केली आहे.

## पान १ वरून...

### मराठवाडा, उत्तर महाराष्ट्राला

मांडला असल्याचे त्यांनी नमूद केले. नदीजोड प्रकल्प ८७ हजार कोटींचा असेल. पुढील ४ महिन्यात त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) बनवून त्याला सगळ्या मान्यता घेऊ. मराठवाड्यात अंतिम सिंचन क्षमता १७ लाख हेक्टर एवढी आहे. त्यापैकी १२.६८ लाख हेक्टर आपण तयार केली आहे. ११० लघू आणि ६९ मोठे प्रकल्प पूर्ण केले आहेत. इतर बांधकामाधीन आहेत. दमणगंगा, वैतरणा, गोदावरी नदीजोड प्रकल्प ५.६८ टीएमसीच्या पुढे गेला आहे. त्याचा जवळपास ३३ हजार हेक्टर क्षेत्राला लाभ होईल. मोठ्या प्रमाणात सिंचन क्षमता आपण तयार करु शकणार आहोत, असे त्यांनी सांगितले. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत आतापर्यंत ६० टक्के पंप जोडले आहेत. प्रति दिवस पंधराशे पंप शेतकऱ्यांना दिले जात असून ४० लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यात यश आले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आतापर्यंत राज्यातील ४६ लाख कृषी ग्राहकांपैकी ३३ लाख कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवत आहोत. सूर्यघर योजनेतही महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. घरगुती विजेचे दरही कमी होतील. घरगुती ग्राहकांसाठी विजेचे दर पाच वर्षांत २६ टक्क्यांनी कमी होणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. ऊर्जा क्षेत्रात राज्याला ५५ पुरस्कार मिळाले असल्याचेही ते म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना उत्तम आहे. यासाठी १०० टक्के यंत्रसामुग्रीचा वापर करुन रस्ते करता येणार आहेत. या योजनेसाठी १ हजार कोटी अर्थसंकल्पात राखून ठेवले आहेत. शेत, पाणंद रस्ते शेतकऱ्यांकरिता आणि ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा असल्याचे ते म्हणाले.

----------------

### लोकसभा अध्यक्षांविरुद्धचा

प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळल्यानंतर पीठासीन अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी लोकसभेचे कामकाज गुरुवार सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित केले. विरोधकांचा गोंधळ वाढत असताना जगदंबिका पाल यांनी सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. मात्र, विरोधक ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे पाहून ''तुम्हाला सत्य ऐकायचे नाहीये,'' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना फटकारले. विरोधकांच्या गदारोळातही अमित शाह यांनी आपले भाषण सुरूच ठेवले. ''डोकलाम वादाच्या वेळी काँग्रेस नेते चीनला गेले होते आणि चिनी दूतावासात गुप्त बैठका घेत होते. काँग्रेसनेच अक्साई चीनचा भाग चीनला दिला,'' असा गंभीर आरोप शाह यांनी यावेळी केला. गृहमंत्र्यांचे भाषण पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढवण्याचा प्रस्ताव पीठासीन अध्यक्षांनी मांडला. यावेळी विरोधकांनी गृहमंत्र्यांनी असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप केला. यावर प्रत्युत्तर देताना शाह म्हणाले, ''माझ्या भाषणात कोणताही असंसदीय शब्द असेल तर तो कामकाजातून काढून टाकावा.'' अमित शाह यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधताना म्हटले की, ''राहुल गांधी महत्त्वाच्या मुद्द्यांवर बोलतच नाहीत. १७ व्या लोकसभेत त्यांची उपस्थिती केवळ ५१ टक्के होती. जेव्हा बजेट सत्र किंवा इतर महत्त्वाचे प्रसंग असतात, तेव्हा ते परदेशात असतात. अनेक महत्त्वाच्या विधेयकांवरील चर्चेवेळी ते सभागृहात अनुपस्थित असतात.

------------

### एसटी महामंडळात लवकरच

मोठा संप झाला होता. त्या काळात अनेक बस स्थानकांवर गाड्या उभ्या राहिल्या होत्या आणि प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन १ फेब्रुवारी २०२२ रोजी तातडीने निविदा प्रक्रिया राबवून काही कंत्राटी कामगारांची नियुक्ती करण्यात आली होती. ही नियुक्ती केवळ संपाच्या काळापुरती तात्पुरती होती. संपाच्या काळात सुमारे १२ हजार ५०० हजार बसेस होत्या, तर सध्या सुमारे १४ हजार बस उपलब्ध आहेत. दरवर्षी ५ हजार नवीन बस खरेदी करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार ८ हजार बस खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यापैकी ३ हजार बसचे वितरण सुरू झाले आहे. बसेसची संख्या वाढत असल्यामुळे जुन्या कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात काही कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

------------

### खत विक्रीत अनियमितता

जयंत पाटील, अभिजित पाटील यांनी सहभाग घेतला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे पुढे बोलताना म्हणाले की, नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यात खताच्या दरवाढी आणि उपलब्धतेबाबत शेतकरी पुत्र संघर्ष समितीने तक्रार केल्यानंतर जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी कृषी विकास अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या अध्यक्षतेखाली भरारी पथक स्थापन केले. या पथकाने ८ डिसेंबर २०२५ रोजी नायगाव येथील सात रासायनिक खत विक्री केंद्रांची तपासणी केली. तपासणीत चार विक्रेत्यांनी निश्चित दरापेक्षा जास्त दराने खत विक्री केल्याचे, तर तीन विक्रेत्यांनी साठा असूनही शेतकऱ्यांना खत उपलब्ध करून दिले नसल्याचे आढळले. त्यामुळे सातही विक्रेत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देश कृषी आयुक्तांना देण्यात आले असून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे सांगितले. पुढे बोलताना मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात तपासण्या सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. १ एप्रिल २०२५ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरात १,१४,८६० विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १,५४३ विक्रेत्यांचे परवाने निलंबित, १,१७४ परवाने रद्द, तर २,९५६ विक्री बंदचे आदेश देण्यात आले. तसेच २,१४९ उत्पादनांची तपासणी करून ५२,९१० नमुने तपासण्यात आले. त्यापैकी ३,४६२ नमुने अप्रामाणिक आढळले असून सुमारे ३,१०० मेट्रिक टन खताचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणांमध्ये १४७ जणांवर पोलीस गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. राज्यात सध्या खताचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांना खताच्या बाबतीत कोणतीही अडचण येणार नाही, असेही यावेळी सांगितले.

----------

### परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास

आराखड्यातून एक भव्य भक्त निवास उभारण्यात आले असून, त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, त्याचबरोबर दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्याचे काम सुरू आहे, तर दुसरीकडे प्रवेश द्वारकडील दगडी पायऱ्या, डोंगर तुकाई स्थानाचा विकास, दगडी प्रवेशद्वार, यांसह विविध कामे सुरू आहेत. या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी स्व. अजितदादा काही दिवसांपूर्वी परळीत आले तेव्हा वाढीव निधीसह विविध कामांच्या टप्प्यांची चर्चा झाली होती. याबाबत मुख्यमंत्री महोदय यांनी अधिकृत घोषणा केल्याने, धनंजय मुंडे यांनी स्व.अजितदादा यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामाला आता आणखी गती मिळणार आहे.

--------

### एलपीजीचा पुरेसा साठा

एलपीजी उत्पादनाला प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार देशातील तेल शुद्धीकरण कंपन्यांना प्रोपेन व ब्यूटेन यांसारख्या घटकांचा वापर प्राधान्याने एलपीजी उत्पादनासाठी करून तो सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिंदुस्तान पेट्रोलियम उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या एलपीजीचा पुरवठा प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसाठी करण्यात येणार आहे. तेल विपणन कंपन्यांनीही स्पष्ट केले आहे की, घरगुती ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू राहील. तसेच रुग्णालये, शैक्षणिक संस्था यांसारख्या अत्यावश्यक गैर-घरगुती क्षेत्रांनाही आवश्यकतेनुसार एलपीजी पुरवठा करण्यात येणार आहे. इतर गैर-घरगुती क्षेत्रांच्या मागण्यांचे परीक्षण करून प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी तेल विपणन कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समितीही स्थापन करण्यात आली आहे. विभागातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना घरगुती एलपीजी गॅसच्या सुरळीत वितरणासाठी तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी जिल्हास्तरावर दक्षता फिरते पथक स्थापन करून तपासण्या करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच घरगुती गॅसचे वितरण नियमित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासही सांगितले आहे. या सर्व उपाययोजना करण्यात आल्या असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच घाबरून जाऊन अनावश्यक सिलिंडर साठा करण्याचा प्रयत्न करू नये. प्रशासन व तेल विपणन कंपन्या एलपीजीच्या पुरवठ्यावर सातत्याने लक्ष ठेवून असून नागरिकांना मागणीनुसार सिलिंडर उपलब्ध करून दिले जात आहेत. त्यामुळे नागरिकांनी शांतता राखून आवश्यक तेवढ्याच प्रमाणात एलपीजीचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

------------

### हरीश राणा यांना निष्क्रिय

पोषण घेत आहे. हरीशच्या उपचाराचा खर्च पेलण्यासाठी त्याच्या पालकांना मोठे कष्ट सोसावे लागले. उपचार सुरू ठेवण्यासाठी त्यांनी दिल्लीतील आपले घर विकले. यानंतर गाझियाबादला स्थलांतर केले. एम्स रुग्णालयात दीर्घकाळ उपचार सुरू असल्याने आणि वाढत्या खर्चामुळे कुटुंबावर मोठा आर्थिक ताण आला होता. हरीश राणा यांची प्रकृती सुधारणे अशक्य असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत होते. मात्र, त्यांना केवळ नळीद्वारे अन्न दिले जात होते. २०१८ च्या नियमांनुसार केवळ व्हेंटिलेटरसारखी कृत्रिम जीवनरक्षक प्रणाली काढून घेण्याची तरतूद होती, पण फीडिंग ट्यूबबाबत स्पष्टता नसल्याने रुग्णालय प्रशासनासमोर अडचण निर्माण झाली होती. याच तांत्रिक अडचणीमुळे हरीशच्या पालकांनी न्यायालयाचे दार ठोठावले होते. अखेर सर्वोच्च न्यायालयाने हरीशवर सुरू असलेले वैद्यकीय उपचार थांबवण्याचे आदेश दिले, ज्यामुळे त्याला सन्मानाने मृत्यू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## अंकुश कोचिंग क्लासेसने युवकाचा जीव घेतला?

### क्लासेसच्या मजल्यावर पाणी घेताना करंट लागून मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

**अंकुश कोचिंग क्लासेसने करण मोरे युवकाचा जीव घेतला. या क्लासेस येथे युवकाला करंट लागून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित युवक हा खरपुडी येथील रहिवासी असल्याचे समजते. नेमकी घटना कशी घडली याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसून याबाबत पोलीस कसून तपास करीत आहे दरम्यान, घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. सदरील घटना अंकुश सरांचं क्लास वरती पाणी घेताना घटना घडल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या घटने प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली परंतु सत्य घटना कशामुळे घडली हे समोर येणे गरजेचे आहे. याला जबाबदार कोण याचे पण नियमाप्रमाणे चौकशी होणे गरजेचे आहे.



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १२ मार्च २०२६


## थोडक्यात



बीड : शहरातील सीए जाधव व सीए नारायण गाडे यांनी बीड शहरातील नगरसेवक ॲड.गोविंद नवनाथ शिराळे यांचा नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे येथील ज्येष्ठ वकील श्रीकांत अगस्ते, ॲड.संदीप चोरगे, ॲड. सुहास कांदे, कृष्णा शिराळे, पुणे येथील वकील मंडळी.

### सरस्वतीबाई जन्नाथराव लोखंडे यांचे निधन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

अंबाजोगाई न्यायालयातील वरिष्ठ लिपीक ज्ञानेश्वर लोखंडे यांच्या मातोश्री सौ. सौ. सरस्वतीबाई जन्नाथराव लोखंडे यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षे होते.



श्री संत सावतामाळी मंदिर परिसरात राहणाऱ्या सौ. सरस्वतीबाई जन्नाथराव लोखंडे या अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या आणि धार्मिक वृत्तीच्या म्हणून परिचित होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्यावर अंबाजोगाई येथील दवाखान्यात उपचार सुरू होते. त्यातच आज बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याचे सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

आज परळीत होणार अंत्यसंस्कार

स्व. सौ. सरस्वतीबाई जन्नाथराव लोखंडे यांच्या पार्थिवावर उद्या गुरुवार दवाज१२ मराहते२०२६ रोजी सकाळी १० वाजता परळीतील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. अंत्ययात्रा राहते घर सावतामाळी मंदिराजवळून निघणार आहे.स्व. सौ. सरस्वतीबाई जन्नाथराव लोखंडे यांच्या पश्चात पती जगन्नाथराव लोखंडे, मुलगा ज्ञानेश्वर, सुन, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ओमराजे सातपुते प्रथम

बीड । प्रतिनिधी

द.बा. घुमरे पब्लिक स्कूल, बीड च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये चंपावती शाळेच्या वतीने सहभागी झालेल्या ओमराजे परमेश्वर सातपुते यांनी उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य दाखवत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.



स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल ओमराजे यांना माजी आमदार राजेंद्रजी जगताप साहेब, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरुण नाना डाके, उद्योजक रमेश भाऊ पोकळे, छत्रपती संभाजी राजे शिक्षण प्रसारक मंडळ पारगावचे सचिव दिपकरावजी घुमरे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख ५१०० रुपये पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी तसेच शिक्षक व पालकांनी त्यांचे कौतुक केले. चंपावती शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनामुळे ओमराजे यांनी हे यश संपादन केले. शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहन, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव यामुळेच त्यांची वक्तृत्वकला अधिक उजळून निघाली. ओमराजे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या या यशामुळे चंपावती शाळेचे तसेच पालकांचे नाव उज्ज्वल झाले आहे.

# बीडमध्ये ३ एप्रिलपासून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

**शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञानाची मोठी पर्वणी, विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उद्घाटन ; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती**

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, नव्या संशोधनाची माहिती आणि विविध कृषी उत्पादनांची ओळख व्हावी या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. याच परंपरेत यावर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहावरून ३ ते ६ एप्रिल दरम्यान बीड येथे भव्य राज्यस्तरीय ''किसान कृषी महोत्सव'' आयोजित करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड) बीड येथील विस्तीर्ण मैदानावर चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक व कृषीभूषण महेश बेदरे यांनी




प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

किसान कृषी विकास प्रतिष्ठान गेल्या १८ वर्षांपासून मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी प्रदर्शनांचे आयोजन करत आहे. गेवराई, जालना, परभणी, हिंगोली यांसह अनेक ठिकाणी झालेल्या या प्रदर्शनांना शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहानुसार यंदा बीड येथे या कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग,



वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन तसेच ओंकार साखर कारखाना समूह यांचा विशेष सहभाग राहणार आहे. प्रदर्शनामध्ये आठ भव्य दालनांद्वारे सुमारे २०० हून अधिक कृषी उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तसेच आधुनिक कृषी अवजारांचे प्रात्यक्षिक, विविध कंपन्यांचे शेतीसाठी उपयुक्त तंत्रज्ञान, सौर ऊर्जेवर चालणारी उत्पादने, शेतीतील नव्या संकल्पनांची माहिती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहे. या चार दिवसीय महोत्सवात एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो, तज्ज्ञांची चर्चासत्रे, धान्य महोत्सव, सौर ऊर्जेवरील उत्पादनांचे विशेष दालन तसेच शेतमजुरीला पर्याय ठरणाऱ्या आधुनिक अवजारांचे स्वतंत्र दालन अशी अनेक आकर्षणे असणार आहेत. उद्घाटन व समारोप सोहळ्यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे.

बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीचे संयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

### धान्य महोत्सवात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री

शहरी भागातील ग्राहकांना शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान्य, कडधान्य व इतर कृषी उत्पादने थेट मिळावीत या उद्देशाने कृषी प्रदर्शनात विशेष धान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मध्यस्थांशिवाय शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट व्यवहार होऊन शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे.

### एआय तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

सध्या शेती क्षेत्रात डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये कसा वापर करता येतो, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दाखवण्यात येणार आहेत. विशेषतः ऊस शेतीसह इतर पिकांमध्ये तंत्रज्ञानाचे महत्त्व आणि त्याचे फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार असून हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरणार आहे.

# मोटारसायकल मेंढ्यांनी पाडल्याने झाला वाद

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील घळाटवाडी शिवारात दोन मेंढपाळ बांधवांवर हल्ला झाल्याची घटना दि. ११ बुधवारी घडली असून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने ग्रामीण पोलिसांकडे निवेदनाद्वारे दि. ११ बुधवारी करण्यात आली आहे.

ग्रामीण पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वडवणी तालुक्यातील पुसरा येथील मेंढपाळ निवृत्ती चंदू बिडे व लहू चंदू बिडे हे माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी शिवारात मेंढ्या चारत असताना झालेल्या



**हल्ला झालेल्या दोन मेंढपाळ बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी आज ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके माजलगावात येणार**

वादातून शिवीगाळ गणेश पांडुरंग नरवडे व आनंद पांडुरंग नरवडे यांनी या दोघांवर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या हल्लच्यात जखमी झालेल्या दोन्ही मेंढपाळांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सकल धनगर ओबीसी समाजात संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अन्यथा दि. १२ गुरुवार पासून ग्रामीण पोलीस स्टेशनसमोर सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके सर यांच्या उपस्थितीमध्ये धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विलास नेमाने, संतोष देवकते, अविनाश कांडुरे, अर्जुन भुतकर, विशाल देवकते राज अर्जुन, विजय धायगुडे, कल्याण कस्पटे शंकर गावडे दत्ता आबुज मनोज कोरडे यांनी दिला आहे.

## पान ६ वरुन...

### पाणी बचतीतून वृक्षारोपणाचा

रोवून त्यात लहान खडे टाकले. व पाईप भोवती माती टाकून पाणी पाईपाव्दारे टाकले असता ते थेट झाडाच्या मुळाशी गेले व पाणी बचतही झाली. वृक्षारोपणासाठी योगेश्वरी वसतीगृहातील उमेश फडके,सार्थक सुरवसे,अमोल पवार,अथर्व जाधव,लक्ष्मण ढगे, साहेब जाधव आदी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.यो.शि.संस्था निसर्ग संवर्धन मंडळाच्या माध्यमातून एक पेड शाहिदोंके नाम या उपक्रमातर्गत श्रीमती गो.कु.यो. कन्या विद्यालयात हे वृक्षारोपण झाले.पर्यावरण दूत प्राचार्य मेजर एस.पी.कुलकर्णी, प्रशांत बर्दापूरकर,दत्ता बन्सोडे,राहूल देशपांडे आदी उपस्थित होते.

### योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या

सूचना, अत्याधुनिक माहिती घेता येणार आहे. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर,जेष्ठ सल्लागार प्रा. एम.एस.लोमटे,रमण सोनवळकर,मेजर एस. पी.कुलकर्णी,प्राचार्य रमण देशपांडे, विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड,प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे व पॉलिटेक्निकचे शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

### तहसीलदारसाहेब मंजरथ

मंजरथ गोदावरी घाटावर नदीपात्रात अवैध वाळू उपसा व चोरटी वाहतूक खुलेआम सुरू असणे ही गंभीर बाब ठरत आहे.

कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी थेट कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी वर असताना, वाळू माफिया दिवसाढवळ्या केनी, जेसीबी व ट्रॅक्टरने मंजरथ १घाटावर गोदावरी नदीची लूट करत असतील तर हे प्रशासनाचं अपयश नाही का? की राजकीय आशीर्वादामुळेच माफियांची हिम्मत वाढली आहे? असा थेट सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

केनी-पोकलेन व जेसीबीने उपसा करून चोरटी वाहतूक सुरु असताना गुन्हे नोंदवायला पोलीस आणि महसूल पथकाचे हात थरथरतो का?; की वाळू माफियांचा धंदा सेट करुन दिला? मंजरथ सर्कलच्या जनतेमध्ये चर्चा

### लाडक्या बहिण योजनेच्या

सपकाळ पो.कॉ. योगेश बहिरवाळ, व महिला पोलीस अमलदार यांनी जालना येथील रेल्वे स्थानक परिसरातून दि.९ मार्च रोजी ताब्यात घेऊन अटक केली. व त्याच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर २१/२०२६ अन्वये कलम ३१८/४ भा.न्या. संहिता अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अंमळनेर पोलीस तपासासाठी त्याच्या मागावर असताना सदरील गुन्ह्याचे तपासामध्ये जवळपास २५ ते ३० मोबाईल नंबर चे सीडी आर काढून त्याहून हजारो मोबाईल क्रमांकाची पडताळणी करण्यात आली. सदरील ''ठग'' हा वारंवार सिम कार्ड बदलत असल्याने व मोबाईल चालू बंद करत असल्याने तपास कार्यात अडचण येत असे, तांत्रिक मदतीच्या साह्याने व अतिशय बारकाईने तपास करून ठगास ९,मार्च रोजी जालना शहरातून ताब्यात घेण्यात आले. व अटकेची कारवाई करण्यात आली.सदर ठग हा वेगवेगळे सिम कार्ड वापरून नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर भागात हुलकावणी देत होता. गोरक्षनाथ पन्हाळकर प्रमाणे महिलांची फसवणूक करणारी मोठी टोळी सक्रिय असल्याची नागरिकांतून चर्चा ऐकव्यास मिळत आहे. हे ''ठग'' जि.प. सदस्य, लोकप्रतिनिधी व जवळच्या प्रतिष्ठित नागरिकांची ओळख सांगून विश्वासात घेऊन महिलांना फसवीत आहेत असेच अनेकांना फोन आल्याची चर्चा आहे.सदरील अटकेची कारवाई स.पो.नी. भार्गव सपकाळ पो.कॉ. योगेश भहीरवाळ, होमगार्ड दिलीप घोशीर, महिला होमगार्ड पूजा तिपटे, शितल पवळ यांनी केली आहे. व पुढील तपास कामात उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, पो. ह. बबन शिंदे, विलास माळी भरत राठोड, शाम खाडे संतोष कसाब, गणेश गोसावी, मारुती म्हेत्रे, शत्रुघन दिंडे, चालक ईसूफ शेख हे सहकार्य करत आहेत.

### नगरोत्थान योजनेअंतर्गत ११०

पवन मुंडे यांनी या १९ कोटी रुपयांच्या उद्घाटन केलेल्या या कार्यक्रमास केवळ १० ते १२ नगरसेवक आणि त्यांचे पती उपस्थित होते.जवळपास २५ नगरसेवकांनी कार्यक्रमावर बहिष्कार टाकत आपल्याच पदाधिकार्याविरोधात नाराजीचा सुर आवळला.

नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनावर पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष रानबा गायकवाड, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष शेख मुकरम, उपाध्यक्ष बाबा शेख, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सावित्रीमाई फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याची आठवण करून दिली. समाजातील वंचित, शोषित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले योगदान अतुलनीय असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. या प्रसंगी गुलाबराव गायकवाड, विश्वनाथ सावंत, राणोजी वैद्य, बाबुभाऊ कांबळे, संजय हतागळे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी सावित्रीमाईंच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. सावित्रीमाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून त्यांच्या विचारांचा जागर समाजात कायम राहावा, असा संदेश देण्यात आला.

### घरगुती गॅस सिलेंडरच्या

उत्पादनात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. एकीकडे केंद्र सरकार राज्य सरकार कडक पावलं उचलत असताना दुसरीकडे मात्र बीड शहरासह जिल्ह्यात

हॉटेल खानावळ, चहाची टपरी, चाट भांडार,धाबे आशा व्यावसायिक ठिकाणी गेल्या सर्रास घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केला जात आहे. त्यामुळे मोठमोठ्या शहरांमध्ये हॉटेलिंग व्यवसाय धोक्यात आलेला असताना बीडमध्ये मात्र अशा व्यवसायांना कुठलाच फरक पडला नाही.गॅस टंचाई जाणवली नाही. मात्र राजरोस होणाऱ्या या काळाबाजारी मुळे सर्वसामान्य जनतेला गॅस टंचाईला सामोरे जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशावेळी जिल्हा पुरवठा विभाग मात्र बघ्याची भूमिका घेत काळाबाजारीला खतपाणी घालत असल्याचा चित्र पाहायला मिळत आहे. येणाऱ्या काळात घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवला तर याचा फटका सर्वसामान्य जनतेला बसणार आहे.व्यावसायिक प्रतिष्ठानासह काळाबाजार करणाऱ्या लोकाविरोधात गुन्हे दाखल करावेत अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून होऊ लागली आहे.

# देशात महिला सक्षमीकरणाचा प्रारंभ सावित्रीबाई फुले यांनी केला-प्रा.गुंजाळ

बीड । प्रतिनिधी

१९ व्या शतकात महिला सक्षमीकरणासाठीच्या उपाययोजना आणि



कार्यक्रम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजाला दिले.शिक्षण हा स्त्री अधिकाराचाच भाग आहे असे निक्षुण सांगून स्त्री शिक्षणाच्या प्रक्रियेला गती दिली, असे गौरवोद्गार ओबीसीचे जेष्ठ नेते प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी काढले.


येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्ट द्वारा आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या पुण्यतिथी निमित्त प्रमुख वक्ते म्हणून गुंजाळ बोलत होते.ते पुढे बोलताना ते म्हणाले की शिक्षणाबरोबरच त्यांनी परंपरेने चालत आलेल्या बालिकाहत्या, केशवपन, हुंडा पद्धती, सती प्रथा इत्यादींचे खंडन करून विधवा पुनर्विवाहला गती दिली. समाजातील जातिवाद संपवण्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे क्रांतिकारी कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले.तेच दिशादर्शक कार्य करण्याची आज गरज आहे. असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे पत्रकार नारायण नागरे यांचेही यावेळी समायोचित भाषण झाले. शहरात श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टने अल्पावधीत मोठे काम उभा केले आहे. त्यात सातत्या राहावी. महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी केल्यामुळे समाजात सुसंवाद वाढतो असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक ट्रस्टचे सचिव शामसुंदर घाडगे यांनी केले. प्रस्ताविका त्यांनी भ्रष्टाचे ध्येय धोरण स्पष्ट केले. याप्रसंगी सर्वश्री ट्रस्टचे अध्यक्ष गोरख यादव, सहसचिव नितीन साखरे, कोषाध्यक्ष मोहनराव गोरे, कार्याध्यक्ष भागवत शिंदे,सदस्य नामदेव दुधाळ, किशोर जवंजाळ, पाननखडे इत्यादींची उपस्थिती होती.

# ॲट्रॉसिटी आणि विनयभंगाच्या खटल्यातून आरोपींची निर्दोष मुक्तता







बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपीची जिल्हा व सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात भारतीय दंड संहिता () कलम ३५४, ५०४, ५०६ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ च्या कलम ३(१)(आर), ३(१)(एस) व ३(२)(व्हीए) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाची माहिती:

संबंधित प्रकरणात आरोपी संदीप सुदाम कदम रा. खापर पांगरी ता. जिल्हा.बीड विरुद्ध आरोप लावण्यात आले होते. सबल पुराव्याअभावी मे दुसरे जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

कायदेशीर यश:

या खटल्यात आरोपी वतीने ॲड. सुभाष आर काळे यांनी मुख्य बाजू मांडली. त्यांना या कायदेशीर लढाईत ॲड. शेख सद्दाम शेख इस्माईल आणि ॲड. आदर्श अरुणराव जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या वकिलांच्या टीमने केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीला न्याय मिळाला आणि त्यांची निर्दोष मुक्तता झाली.

# रेणुकामाता संस्थानात सोमवारी भव्य लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी मागील ६ महिन्यांपासून भावार्थ रामायण कथा सुरु असून या रामायणातील अतिशय महत्त्वाच्या युध्दकाण्ड यातील भव्य अशा लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमाचे येत्या दि.१६ मार्च २०२६ सोमवार रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता आयोजन करण्यात आले असून याठिकाणी वडवणी व पंचक्रोशीतील हजारो रामभक्त, वाचक, सूचक व भाविक गण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार असून तरी या भव्य लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमासाठी वडवणी पंचक्रोशीतील सर्व वाचक, सूचक व रामभक्तांनी रामायण कथा श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा व सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील चिंचवण रोडवरील श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी मागील सहा महिन्यांपासून भावार्थ रामायण कथेस प्रारंभ झालेला असून या रामायण कथेसाठी वाचक म्हणून राहुल महाराज दुटाळ तर सुचक म्हणून बाबासाहेब महाराज आंधळे हे दैनंदिन रामायण कथेचे वाचन व विस्तृत वर्णन करत आहेत. या ठिकाणीच या अगोदरही भव्य असे रामायण कथा सोहळा संपन्न झालेले आहेत. संपुर्ण रामायणामध्ये रामायणाचे सात काण्ड असून यामध्ये बालकाण्ड, आयोध्याकाण्ड, अरण्यकाण्ड, किष्किंधाकाण्ड, सुंदरकाण्ड, युध्दकाण्ड (लक्ष्मण शक्ती), उत्तर काण्ड असे एकूण सात काण्ड आहेत. यापैकी बालकाण्ड, आयोध्याकाण्ड, अरण्यकाण्ड, किष्किंधाकाण्ड, सुंदरकाण्ड हे पूर्ण झाले असून आता युध्दकाण्डामध्ये अतिशय महत्त्वाच्या असलेल्या लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमाचे भव्य अशा आयोजनाची तयारी याठिकाणी सुरु झालेली असून येत्या दि.१६ मार्च २०२६ सोमवार रोजी श्री.रेणुकामाता संस्थान वडवणी या ठिकाणी या भावार्थ रामायणातील लक्ष्मण शक्तीचा हा ऐतिहासिक सोहळा संपन्न होणार आहे. सायंकाळी ठीक ७ वाजता या लक्ष्मण शक्तीच्या वाचन कार्यक्रमास सुरुवात होईल. तसेच दुसऱ्या दिवशी दि.१७ मार्च २०२६ मंगळवार रोजी सकाळी ठीक ७ वाजता महाप्रसादाची पंगत सुरु होईल. वडवणी व पंचक्रोशीतील हजारो रामभक्त, वाचक, सूचक व भाविक गण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार असून तरी या लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमासाठी वडवणी पंचक्रोशीतील सर्व वाचक, सूचक व रामभक्तांनी रामायण कथा श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा व सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ व वडवणी पंचक्रोशीतील समस्त रामभक्त यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड**
**(दंड विभाग)**

दूरध्वनी ०२४४७-२६२१४१ दिनांक ०६.११.२०२५
२०२५/दंड/कावि-
विषय-जन्म नोंद आदेश मिळणे बाबत
संदर्भ: -१. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ ईऑ ९९११८ १/प्र.क्र.२२/कु.क.नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार कटुमियाँ सरदार शेख रा.गेवराई ता.गेवराई यांचा अर्ज दिनांक १७.१२.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार कटुमियॉ सरदार शेख रा. गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा आदील कटुमियॉ शेख यांचा जन्म दिनांक ०१.१२.२०२१ रोजी गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयात संदर्भीय अर्जादाने विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ईऑ ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म मृत्यु ठीकाणचा व रहीवासींचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक राहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी गेवराई**

# राज्यात १२६ कारखान्यांची धुराडी बंद

## ९५ लाख टन साखर उत्पादन; सर्वाधिक साखर उतारा कोल्हापूरचा

पुणे : राज्यातील यंदाचा साखर हंगाम संपण्याच्या मार्गावर असून यंदा सुरू झालेल्या २१० सहकारी व खासगी साखर कारखान्यांपैकी आतापर्यंत १२६ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. राज्यात आतापर्यंत १ हजार १० लाख टन उसाचे गाळप झाले असून, ९५ लाख ६९ हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. या गाळपातून ९.७४ टक्के साखर उतारा मिळाला आहे. सर्वाधिक २३ लाख टन साखरेचे उत्पादन कोल्हापूर विभागातून झाले असून पुणे विभागात २१ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली आहे.

यंदा राज्यातील २१० सहकारी व खासगी कारखान्यांनी साखर आयुक्त कार्यालयाकडून गाळपाचे परवाने घेतले होते. यंदा पावसाळा लांबल्याने गाळप हंगामाला उशीर होईल, अशी शक्यता वर्तवण्यात होती. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत गाळप हंगाम एक नोव्हेंबर रोजी सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. गेल्यावर्षी लागवड झालेल्या उसाचे क्षेत्र तुलनेने कमी असल्याने गाळपास येणारा ऊस हा कारखान्याच्या




गाळप क्षमतेच्या तुलनेत कमी होता. त्यामुळे यंदाचा गाळप हंगाम मार्चअखेरीस संपेल, असे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे म्हणणे होते. त्यानुसार राज्यात आतापर्यंत १२६ कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. तर ८४ कारखाने अद्यापही सुरू आहेत. या कारखान्यांनी आतापर्यंत १ हजार १० लाख टन उसाचे गाळप केले असून, यातून ९५ लाख ६९ हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. या हंगामात आतापर्यंत ९.४७ टक्के साखर उतारा मिळाला आहे. कोल्हापूर विभागात २३ लाख १० हजार टन, तर त्याखालोखाल पुणे विभागात २१ लाख ३० हजार टन साखरेचे उत्पादन झाले आहे. सोलापूर विभागात १८ लाख ४८ हजार, अहिल्यानगर विभागात ११ लाख ३१ हजार, छत्रपती संभाजीनगर विभागात ८ लाख ८४ हजार, नांदेड विभागात १ लाख १४ हजार, अमरावती विभागात १ लाख १० हजार टन साखर उत्पादित झाली आहे. साखर उताऱ्याचा विचार करता कोल्हापूर विभागात सर्वाधिक ११.०१ टक्के साखर उतारा मिळाला असून, त्याखालोखाल पुणे विभागात ९.८४ टक्के उतारा मिळाला आहे. नांदेड विभागात ९.३८, अमरावती विभागात ९.३२, अहिल्यानगर विभागात ९.०७, तर सोलापूर विभागात ८.५७ टक्के साखर उतारा मिळाला आहे.

## अंडी उत्पादनासाठी पाळली जाणारी 'ब्लॅक मिनोर्को' कोंबडी!

विदेशी कोंबडीच्या दिसायला सुंदर आणि उत्साही जातींमध्ये ब्लॅक मिनोर्को' कोंबडीला विशेष महत्व आहे. स्पेनच्या पश्चिम किनाऱ्यावरील एका सुंदर बेटावर आढळणारी मिनोर्को कोंबडी दिसायला फारच आकर्षक आहे.

उगम : या कोंबडीचा उगम स्पेनच्या मेनोर्का या भूमध्य बेटावर झाला आहे. त्यामुळे या जातीचे नाव मिनोर्को असे ठेवण्यात आले आहे. १८ व्या शतकात ब्रिटिशांनी या कोंबडीच्या जातींना दत्तक घेतले घेतलेल्या या जाती संकरित जाती निर्माण होण्यापूर्वी १०० वर्षे लोकप्रिय होत्या. ही कोंबडी एके काळी पांढरे शुभ्र मोठे अंडे घालण्यासाठी प्रसिध्द होती पण इतर जातींशी संकर केल्यामुळे तिच्यातील हा गुण नाहीसा झाला.

शरीर रचना : मिनोर्का कोंबडी तिचे प्रभावशाली व्यक्तिमत्व आणि ताठ शरीर यासाठी ओळखली जाते. ही कोंबडी अभिमानी दिसते. शरीराने व्हाईट लेगहार्नपेक्षा लहान असून सर्व पिसे काळेभोर असतात. चोच काळी असते, तुरा तांबडा असतो, कानाची पाळी पांढरी असून इतर कोंबड्यांपेक्षा मोठी असते. पूर्ण वाढ झालेल्या नराचे वजन २ किलो तर मादीचे १.५ किलो असते.

उत्पादन : जन्मानंतर २० आठवड्यात या कोंबड्यांना लैंगिक परिपक्वता येते. अंडी उत्पादनासाठी पाळली जाणारी ही कोंबडी वर्षभरात सरासरी २०० अंडी देते. शरीराचा मोठा आकार परंतु दुबळी शरीराची रचना यामुळे मांस उत्पादनासाठी या जाती कमी कार्यक्षम आहेत.

विशेषता : मिनोर्का बहुतेकदा शोभेच्या जाती म्हणून पाळल्या जातात. ही चपळ आणि लाजाळू जात आहे. मुक्त परिसरात राहणे त्यांना आवडते. या कोंबडीची चांगली वाढ होण्यासाठी योग्य काळजी आणि व्यवस्थापन आवश्यक असते.



## शेतीत तंत्रज्ञानाची क्रांती; अकोला कृषी विद्यापीठात एआय इन्क्युबेशन सेंटर



अकोला : राज्यातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत महाराष्ट्र शासनाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे एआय ३सी (कृत्रिम बुद्धिमत्ता नवोपक्रम व इन्क्युबेशन केंद्र) स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्याच्या महाॲग्री-एआयधोरण अंतर्गत हे केंद्र उभारले जाणार असून त्यासाठी शासनाने पाच कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. हे केंद्र विशेषतः विदर्भातील कृषी क्षेत्रासाठी महत्त्वाचे तांत्रिक केंद्र ठरणार आहे. या माध्यमातून शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवणे, माहिती-आधारित निर्णय प्रक्रिया मजबूत करणे आणि उत्पादनक्षमता वाढविणे या उद्दिष्टांवर काम केले जाणार आहे. या इन्क्युबेशन केंद्रामार्फत विविध कृषी समस्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उपाय शोधले जाणार आहेत. त्यामध्ये विशेषतः पीक व्यवस्थापनासाठी एआय आधारित सल्ला, हवामानावर आधारित कृषी सल्लागार सेवा, कीड व रोगांचे पूर्वानुमान, अचूक शेती तंत्रज्ञान यांसारख्या उपक्रमांवर संशोधन, नवोपक्रम आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाणार आहे. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले की, या केंद्रामुळे विदर्भातील कृषी क्षेत्राला मोठे तांत्रिक बळ मिळेल. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवकल्पनांच्या माध्यमातून शेतीची परिसंस्था अधिक सक्षम होईल. याशिवाय कृषी विद्यापीठातील नावीन्यता आणि उद्योजकता केंद्रांमुळे आधुनिक तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल. त्यामुळे उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि ग्रामीण युवकांसाठी कृषी-आधारित उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अकोला कृषी विद्यापीठात उभारण्यात येणारे हे कृत्रिम बुद्धिमत्ता इन्क्युबेशन केंद्र राज्यातील कृषी संशोधन, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमांना चालना देणारे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन :राज्य शासनाने राबविलेल्या महाॲग्री-एआय धोरण अंतर्गत कृषी संशोधन, नवकल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये वापर वाढविण्यावर विशेष भर दिला जात आहे. त्याच अनुषंगाने कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, नावीन्यता आणि उद्योजकता केंद्र स्थापन करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३६५: ऑस्ट्रेलिया देशाची राजधानी वियना येथे विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात आली.
१७५५: अमेरिकेमध्ये वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा वापर खादानीतून पाणी काढण्यासाठी करण्यात आला होता.
१८३८: ब्रिटीश रसायनशास्त्रज्ञ सर विलियम हेनरी पर्किन यांचा जन्मदिन.
१८९४: कोका-कोला बाटली मध्ये भरून विक्रीस सुरवात.
१९०४: ब्रिटेन देशांत लाईन वर चालणारी पहिली इलेक्ट्रिक रेल्वे सुरु करण्यात आली.
१९११: कृष्णाजी प्र. खाडिलकरांच्या संगीत मानापमानाचा पहिला प्रयोग झाला.
१९११: गोवा राज्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांचा जन्मदिन.
१९१२: कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहीलेल्या 'संगीत मानापमान' या नाटकाचा पहिला प्रयोग किर्लोस्कर नाटक मंडळीने मुंबईतील रिपन नाट्यगृहात केला.
१९१८: रशियाची राजधानी सेंट पीट्सबर्ग येथून मास्को येथे हलविण्यात आली.
१९३०: ब्रिटिश सरकारने भारतात तयार केलेल्या मिठावर बसवलेल्या अन्यायकारक करामुळे महात्मा गांधी यांनी २०० मैलाच्या दांडीयात्रेला सुरूवात केली.
१९६८: मॉरिशस (इंग्लंडपासून) स्वतंत्र झाला.
१९५४: भारत सरकार मार्फत साहित्य अकादमी पुरस्काराचे उद्घाटन करण्यात आले.
१९९१: जेजुरी येथील खंडोबा मंदिरात चोरी
१९९२: स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २४ वर्षांनी ब्रिटिश सत्तेची सर्व जोखडे झुगारुन देऊन मॉरिशस प्रजासत्ताक बनले.
१९९३: मुंबई येथे झालेल्या १२ स्फोटांच्या मालिकेत ३०० हून अधिकजण ठार तर हजारो लोक जखमी.
१९९९: चेक प्रजासत्ताक, हंगेरी व पोलंड 'नाटो' मधे सामील झाले.
१९९९: सरकारी नोटांवर यापुढे महात्मा गांधींचेच चित्र असेल असा सरकारतर्फे निर्णय घेण्यात आला.
२००१: राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये, सामाजिक आणि आर्थिक विकास या क्षेत्रांतील बहुमोल कामगिरीबद्दल देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार' ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व पर्यावरणवादी नेते सुंदरलाल बहुगुणा यांना प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९१: 'नटवर्य' चिंतामणराव कोल्हटकर अभिनेते व निर्माते
१८२४: गुस्ताव किरचॉफ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ आक्टोबर १८८७)
१९११: दयानंद बाळकृष्ण ऊर्फ 'भाऊसाहेब' बांदोडकर गोव्याचे पहिले मुख्यमंत्री, महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाचे संस्थापक, उद्योगपती आणि दानशूर (जन्म: १२ ऑगस्ट १९७३)
१९१३: यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (मृत्यू:२५ नोव्हेंबर १९८४)
१९२४: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ गुस्ताव किरचॉफ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १८८७)
१९३१: साउथवेस्ट एअरलाईन्स चे सहसंस्थापक हर्ब केलेहर यांचा जन्म.
१९३३: लेखिका कविता विश्वनाथ नरवणे यांचा जन्म.
१९८४: प्रसिध्द पार्श्वगायिका श्रेया घोशाल यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४२: रॉबर्ट बॉश जर्मन अभियंते आणि उद्योजक (जन्म: २३ सप्टेंबर १८६१)
१९६०: भारतीय इतिहासकार क्षितीमोहन सेन यांचे निधन. (जन्म: २ डिसेंबर १८८०)
१९८०: सुप्रसिध्द तबलावादक वसंतराव आचरेकर.
१९९९: यहुदी मेनुहिन प्रसिद्ध व्हायोलिनवादक व वाद्यवृंदसंचालक (जन्म: २२ एप्रिल १९१६)
२००१: रॉबर्ट लुडलुम अमेरिकन लेखक (जन्म: २५ मे १९२७)

# लेमन ग्रासची शेती करुन मिळवा मोठा नफा; करसे ते घ्या जाणून

लेमन ग्रासला चायना ग्रास असेही म्हणतात. लेमन ग्रासमध्ये उपचारात्मक आणि सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्मांची विस्तृत श्रेणी आहे. त्याची पाने प्रामुख्याने विविध औषधे तयार करण्यासाठी वापरली जातात. लेमनग्रासपासून तयार केलेली औषधे डोकेदुखी, दातदुखी आणि ताप यासारख्या विविध समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरली जातात. ही एक सुगंधी वनस्पती आहे ज्याची सरासरी उंची १-३ मीटर आहे. पाने १२५ सेमी लांब आणि १.७ सेमी रुंद आहेत. हे भारत, आफ्रिका, अमेरिका आणि आशियातील उष्णकटिबंधीय आणि उपोष्णकटिबंधीय भागात वाढते. भारतात ते प्रामुख्याने पंजाब, केरळ, आसाम, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात घेतले जाते.

जमिन व माती :हे चिकणमातीपासून ते वाळू, गाळयुक्त माती आणि चांगली निचरा व्यवस्था असलेल्या चिकणमाती मातीमध्ये वाढू शकते. उच्च सेंद्रिय घटक असलेल्या चिकणमाती-वाळू मातीत लागवड केल्यास ते सर्वोत्तम परिणाम देते. ते खराब माती देखील सहन करू शकते. खराब निचरा प्रणाली असलेल्या किंवा जास्त काळ पाणी धरून ठेवण्याची क्षमता असलेल्या मातीत लागवड करणे टाळा. पिकाच्या वाढीसाठी ५.०-८.५ माती सर्वोत्तम असते.

लोकप्रिय जाती सुगंधी, ओडक्कली, निमा, कृष्णा, निमा, एनएलजी ८४, ओडी ४१०.



लागवड पद्धत :लेमनग्रास लागवडीसाठी सुपीक आणि सिंचनक्षम जमीन आवश्यक आहे. नांगरणी आणि मळणी वारंवार करावी. जमीन तयार करताना शेवटच्या नांगरणीच्या वेळी लिंडेन पावडर १० किलो/एकर मातीत मिसळा जेणेकरून पिकाचे वाळवीच्या हल्ल्यापासून संरक्षण होईल. लेमनग्रासची पुनर्लागवड उंच वाफ्यांवर केली जाते.

पेरणीची वेळ :मार्च-एप्रिल महिन्यात रोपवाटिका तयार करा. रोपांसाठी ६० बाय ६० सेमी आणि स्लिपसाठी ९० बाय ६० सेमी अंतर आवश्यक आहे. पेरणीची खोली ही २-३ सेमी असावी. दोन महिन्यांची रोपे मुख्य शेतात पुनर्लागवडीसाठी तयार असतात. १.६ - २ किलो/एकर बियाणे वापरा.

बियाणे प्रक्रिया :दीर्घ काळातील काळी रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी, पेरणीपूर्वी सेरेसन ०.२% किंवा एमिसन १ ग्रॅम/किलो बियाणे वापरून बियाणे प्रक्रिया करा. रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर, पेरणीसाठी बियाणे वापरा.

तण नियंत्रण :शेत तणमुक्त ठेवण्यासाी हाताने खुरपणी आणि कोळपणी करा. तण नियंत्रणासोबतच मातीचे तापमान कमी करण्यासाठी आच्छादन हा एक प्रभावी मार्ग आहे. सेंद्रिय आच्छादन १२०० किलो/एकर वापरा. एका वर्षात २-३ खुरपणी करावी. काही सेंद्रिय नियंत्रण जसे की अतिनील किरणे आणि ज्वाला तण उपटणे करावे. सिंचन :उन्हाळी हंगामात म्हणजेच फेब्रुवारी ते जून या काळात ४-६ पाणी द्यावे. जर पाऊस नियमित नसेल तर पहिल्या महिन्यात ३ दिवसांच्या अंतराने आणि नंतर ७-१० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. उन्हाळी महिन्यांत पिकासाठी ४-६ पाणी देणे आवश्यक आहे.

कीटक आणि त्यांचे नियंत्रण : खोडाच्या खालच्या भागात छिद्र पाडणारी अळी: अळी खोडाच्या तळाशी छिद्र करते आणि ते स्वतः झाडाला खातात. मधली पाने सुकणे हे पहिले लक्षण आहे. कीटकांवर मात करण्यासाठी फोलिडॉल ई ६०५ ची फवारणी केली जाते. लांबलचक काजळीपासून मुक्त होण्यासाठी फुले येण्यापूर्वी डायथेन झेड-७८ २% फवारणी करा किंवा पेरणीपूर्वी बियाण्यांवर सेर्सन ०.२% किंवा एमिसन-६ १ ग्रॅम/किलो प्रक्रिया करा. २० दिवसांच्या अंतराने बाविस्टिन ०.१% च्या दोन फवारण्या किंवा १०-१२ दिवसांच्या अंतराने डायथेन एम-४५ ०.२% च्या ३ फवारण्या करा. करपा या रोगापासून मुक्त होण्यासाठी डायथेन झेड-७८ ०.२% ची १०-१२ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.३% ची फवारणी करावी. गंज या रोगासाठी १०-१२ दिवसांच्या अंतराने डायथेन ०.२% किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.३% किंवा प्लांटॅव्हॅक्स ०.१% फवारणी केल्यास रोग नष्ट होण्यास मदत होईल.

कापणी : रोपे लावल्यानंतर ४-६ महिन्यांनी उत्पादन देण्यास सुरुवात होते. ६०-७० दिवसांच्या अंतराने कापणी केली जाते. कापणीसाठी विळ्यांचा वापर केला जातो. कापणी मे महिन्यात सुरू होते आणि जानेवारी महिन्यात संपते. विळयाच्या मदतीने, कापणीसाठी जमिनीपासून १०-१५ सेमी वर गवत कापले जाते. कापणीनंतर साठवणूक : कापणीनंतर, ऊर्धपातन केले जाते. ऊर्धपातन करण्यापूर्वी लेमनग्रास सोडियम क्लोराईडच्या द्रावणात २४ तास बुडवले जाते कारण त्यामुळे पिकातील सायट्रलचे प्रमाण वाढते. नंतर गवत सावलीच्या जागी साठवले जाते आणि स्थानिक बाजारपेठेत वाहतुकीसाठी पिशव्या किंवा पॅकेटमध्ये पॅक केले जाते. प्रौढ लेमनग्रासपासून प्रक्रिया केल्यानंतर लेमनग्रास तेल आणि लेमनग्रास लोशन सारखी अनेक उत्पादने तयार केली जातात.

# जैवविविधतेत पक्षी-प्राणी यांचे महत्त्व मोलाचे असून त्यांच्या संरक्षणासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

जैवविविधतेचे संतुलन राखण्यात पक्षी व वन्यप्राण्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून पर्यावरण संवर्धनासाठी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पक्ष्यांचे अधिवास जपणे, झाडे लावणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, वन प्रशिक्षण संस्था जालना तसेच महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथील वन प्रशिक्षण संस्था तथा जिल्हा प्रशासकीय संकुलात प्रथमच विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना



पी. एम. मिन्नू, विभागीय वन अधिकारी सुरेश वडदे, सामाजिक वनीकरण विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक अजित पुकळे, वन प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक अजय जाधव, महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र राज्य कार्यकारिणी सदस्य तथा निसर्ग कट्टा संस्थेचे संस्थापक अमोल सावंत, पक्षीमित्र संघटनेचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गिराम, मयूर साबळे आणि सुभाष पारे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात वृक्षपूजन व पक्षीतज्ञ डॉ. सलीम अली व स्व.श्री मारुती चितमपल्ली यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले. त्यानंतर प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी व्हिडिओ संदेशद्वारे या कार्यक्रमास शुभेच्छापर संदेश देऊन पर्यावरण संरक्षण हे आपले संविधानिक जबाबदारी असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, पर्यावरणातील संतुलन राखण्यासाठी पक्षी व प्राणी अत्यंत आवश्यक घटक आहेत. अनेक पक्षी कीड नियंत्रण, परागीभवन तसेच बियांचे प्रसारण करण्याचे महत्त्वाचे काम करतात. त्यामुळे शेती, जंगल आणि पर्यावरण या तिन्ही घटकांसाठी त्यांचे अस्तित्व आवश्यक आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि वृक्षतोडीमुळे पक्ष्यांचे अधिवास कमी होत असून त्यांच्या संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशील होण्याची गरज आहे.विद्यार्थ्यांनी पक्षीनिरीक्षणाची आवड जोपासून पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजात पोहोचवावा. पक्ष्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा प्रकारची संमेलने महत्त्वाची ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम व पर्यावरणाबद्दलची जबाबदारी वाढविण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल. या पक्षीमित्र संमेलनाचे प्रस्ताविक विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांनी करून विद्यार्थी पक्षी मित्र संमेलनाचा उद्देश सांगितला व सामाजिक वनीकरण विभागाकडून राष्ट्रीय हरित सेना व पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अंतर्गत जिल्हाभरात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमा बाबत माहिती दिली. तर महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र राज्य कार्यकारिणी सदस्य तथा निसर्ग कट्टा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सावंत यांनी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे कार्याबाबत सांगून माझे पक्षी अभयारण्य या विषयावर स्लाइड शोद्वारे सादरीकरण केले. महाराष्ट्रात शालेय पक्षी मित्र संमेलन हा उपक्रम अमोल सावंत यांच्या संकल्पनेत सुरू करण्यात आला आहे . जालना येथील प्रसिद्ध पक्षी निरीक्षक तथा महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गिराम यांच्या जालना जिल्ह्यातील पक्षी वैभव या विषयावर आधारित छायाचित्राचे प्रदर्शन दाखवून जालना जिल्ह्याचे पक्षी वैभव यावर स्लाईड शो सादर केला. सर्व विद्यार्थ्यांसाठी पक्षी चित्रकला स्पर्धा घेऊन , पक्षासाठी कृत्रिम घरटे निर्मिती कार्यशाळा, प्रश्नमंजुषा, व्याख्याने इ.उपक्रम घेण्यात आले आहे. या विद्यार्थी पक्षी संमेलनाचा उद्देश असा आहे की जालना जिल्ह्यात जास्तीत जास्त विद्यार्थी पालक शिक्षक यांना पक्षी निरिक्षण आणि पक्षाबाबतीत जास्तीत जास्त माहिती होणे आणि त्या बाबतीत जनजागृती करणे हा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी चित्रकला स्पर्धा, प्रश्न मंजुषा व इतर स्पर्धा मध्ये प्रथम, द्वितीय , तृतीय क्रमांक प्राप्त व सहभागी झालेल्या विद्यार्थीना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. चित्रकला स्पर्धेचे मूल्यांकन कलाशिक्षक परिमल पेडगावकर व अमोल मोरे यांनी केले. पक्षी संमेलनात सहभाग नोंदवलेल्या सर्व शाळांना सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात

### १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

न्यायालयातील प्रलंबित वादांमधून सुटका करून घेण्यासाठी आणि वेळ, पैसा व मानसिक ताण वाचवण्यासाठी जालना जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक महत्त्वाची संधी चालून आली आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून वेळ, पैसा आणि मानसिक ताण वाचवावा. या लोकअदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनी केले आहे. लोकअदालतीमध्ये प्रामुख्याने मोटार अपघात विमा दावे आणि कौटुंबिक वाद, बँकांची वसुली प्रकरणे, वीज वितरण कंपनीशी संबंधित वाद, सर्व प्रकारचे दिवाणी दावे आणि तडजोडपात्र फौजदारी गुन्हे, औद्योगिक, कामगार, सहकार न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रलंबित प्रकरणे आदि प्रकारची प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. तरी संबंधितांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा.

### लक्ष्मी कॉटन कंपनीत महिलांना कायदे व योजनांची दिली माहिती

जालना। प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सामनगाव येथील लक्ष्मी कॉटन स्पिन कंपनीत महिलांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालविकास विभाग जालना अंतर्गत अभय केंद्र (जालना व अंबड) आणि सखी वन स्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांना कायद्याची, सुरक्षा यंत्रणांची आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. कार्यक्रम जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड आणि संरक्षण अधिकारी एस. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी संरक्षण अधिकारी व, सखी वन स्टॉप सेंटरच्या वनिता पिंपळे, महिला सक्षमीकरण जेंडर स्पेशालिस्ट पुष्पा कापसे, आणि चाईल्ड हेल्पलाईन प्रतिनिधी मंगल उगले यांनी उपस्थित महिलांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. कंपनीचे संचालक आणि एच.आर. यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.

## घरणी उड्डाणपुलाजवळ १९ जनावरांची अवैध वाहतूक

लातूर । प्रतिनिधी

घरणी उड्डाणपुलाजवळ एका पिकअप वाहनातून १९ म्हैस जातीची जनावरे दाटीवाटीने व निर्दयपणे वाहतूक करत असल्याचे आढळून आल्याने चाकूर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, घरणी उड्डाण पुलाजवळ मंगळवारी ११ वाजता पिकअप (एमएच ०३ सीडी १७९६) मध्ये ९ म्हैस वगार व १० म्हैस रेडे अशी एकूण १९ जनावरे दाटीवाटीने भरून वाहतूक केली जात असताना पोलिसांनी पकडून वाहनासह ३ लाख ९८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. संदीप आण्णाराव साठे यांच्या फिर्यादीवरून रविराज तात्याराव वाघमारे (रा. वर्ताळा, ता. मुखेड, जि. नांदेड) व महंमद रहिम कुरेशी (रा. खैरताबाद, हैद्राबाद) यांच्याविरुद्ध चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोहे. आय. यू. स्वामी करीत आहेत.

## करदात्यांच्या मोफत धान्याला कात्री ;९२० कुटुंबांचे धान्य होणार बंद

मंठा। प्रतिनिधी

राज्य शासनाच्या मोफत धान्य वाटप योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी आता प्रशासनाने कंबर कसली आहे. मंठा तालुक्यातील जे लाभार्थी प्राप्तिकर भरतात, ज्यांच्याकडे चारचाकी वाहने आहेत किंवा ज्यांची शेती विहित मर्यादेपेक्षा जास्त आहे, अशा अपात्र लाभार्थ्यांना या योजनेतून बाहेर काढण्याचा निर्णय शासनाने घेतला आला आहे. या मोहिमेमुळे तालुक्यातील ९२० कुटुंबांचा मोफत धान्याचा कोटा लवकरच बंद होणार आहे.

शासनाच्या नवीन नियमानुसार, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ४४ हजार रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा जे करदाते आहेत, त्यांना अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ घेता येणार नाही. मंठा पुरवठा विभागाने संकलित केलेल्या माहितीनुसार अनेक सधन व्यक्ती अजूनही शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून सवलतीच्या दरात किंवा मोफत धान्य उचलत असल्याचे समोर आले आहे. अपात्र लाभार्थ्यांची यादी शासनाकडून तहसील कार्यालयास प्राप्त झाली असून जे अपात्र शिधापत्रिका आहेत त्यांचे रेशन कार्ड 'ब्लॉक' करण्याची प्रक्रिया सुरू आहे. गरजूंनाच लाभ मिळावा या भूमिकेतून अपात्र लाभार्थ्यांविरुद्ध ही मोहीम शासनाने हाती घेतली आहे.

''मंठा तालुक्यातील रेशन लाभार्थ्यांची पडताळणी वेगाने सुरू असून, शासनाच्या आदेशानुसार जे लाभार्थी निकषात बसत नाहीत, त्यांचे धान्य पुढील महिन्यापासून बंद केले जाईल.''
सुमन मोरे तहसीलदार, मंठा


''शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मंठा तालुक्यातील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. जे लाभार्थी आयकर भरतात किंवा सधन असूनही मोफत धान्याचा लाभ घेत आहेत, अशांची माहिती संकलित झाली आहे. गरजू आणि पात्र कुटुंबांना त्यांचा हक्क मिळावा, हाच यामागील मुख्य उद्देश आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.''
विकास राजपूत पुरवठा नायब तहसीलदार, मंठा

## २५२ ठिकाणी परवानगी, मात्र शहरात ३५० ठिकाणी होर्डिंग

### मुख्य रस्त्यांच्या दुभाजकांतील पथदिव्यांच्या खांबावर होर्डिंग

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील विविध भागांतील मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंगचा विळखा आहे. या धोकादायक होर्डिंग्ज, बॅनरमुळे रस्तेही धोकादायक झाले आहेत. याशिवाय शहराचे सौंदर्यही बिघडले आहे. महापालिकेकडून ११ एजन्सी अधिकृत आहेत. त्यांना सुरक्षित असलेल्या २५२ ठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर लावण्याची परवानगी आहे. परंतु पोल, इमारतींच्या भिंती, रस्त्यांच्या मधोमध, चौकांत धोकादायक प्रकारे ३५० ठिकाणी अनधिकृत होर्डिंग्ज, पोस्टर्स लावून ४ लाख जालनेकरांच्या जिवाशी खेळले जात आहे.



जालना शहरातील विविध भागांतील मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर लावण्यात आल्याने जालना शहराला जणू विळखाच पडला आहे. पोल, इमारतींच्या भिंती, रस्त्यांच्या मधोमध तसेच चौकांमध्ये धोकादायक पद्धतीने लावण्यात आलेल्या या होर्डिंग्जमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे शहराचे सौंदर्यही बिघडत आहे. विद्रूपीकरण थांबवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर पाऊल उचलले आहे. विजेचे खांब, रस्ते, सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना लावलेले होर्डिंग्ज, बॅनर, पोस्टर्स तत्काळ हटवावेत. अन्यथा २४ तासांनंतर संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल होतील. याबाबत आदेश काढण्यात आले. - आशिमा मित्तल, आयुक्त तथा जिल्हाधिकारी, जालना. महापौर, उपमहापौर निवडीचे बॅनरही धोकादायक ठिकाणी जालना शहरात होर्डिंग्ज लावण्यासाठी ११ एजन्सींना मनपाकडून परवानगी आहे. यात एजन्सींना २५२ फलक लावण्याची परवानगी आहे. यात केवळ श्रीराम पेंटर्स, श्री सह्याद्री यांचा पूर्ण रकमेचा भरणा आहे. उर्वरित ९ एजन्सीधारकांनी मनपाचे ३२ लाख ४० हजार ७५७ रुपये थकवले आहेत. नूतन वसाहत : अंबड चौफुली ते नूतन वसाहत पुलापर्यंतच्या दुभाजकातील पथदिव्यांच्या पोलला धोकादायक होर्डिंग्ज लावले आहेत. गांधी चमन : शनी मंदिर ते गांधी चमन या रस्त्यावर जागोजागी रस्त्याच्या कडेला धोकादायक होर्डिंग्ज आहेत. काही ठिकाणी इमारतींना लोखंड ठोकून धोकादायक होर्डिंग्ज लावले आहेत. नवीन जालना : अत्यंत वर्दळीचा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, मामा चौक, सराफा बाजार, महावीर चौक, भोकरदन नाका, बसस्थानकातही विळखा आहे. महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह स्वीकृत सदस्य निवडीचे बॅनर, होर्डिंग्ज शहरात अनेक ठिकाणी लागले आहेत. परंतु हेही अनेक ठिकाणी धोकादायक स्थितीत लागले आहेत. यामुळे महापौर, उपमहापौर यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना धोकादायक स्थितीत होर्डिंग्ज लावू नका, असे आदेशित करण्याची वेळ आली आहे.

## धुळे-संभाजीनगर हायवेवर एसटी बस जळून खाक



संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी शिवारात एसटी बसला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. शहादा डेपोची शहादा-संभाजीनगर ही बस आमपाली हॉटेलसमोर थांबलेली असतानाच अचानक पेट घेतल्याने काही क्षणातच बस जळून खाक झाली. सुदैवाने प्रवासी जेवणासाठी खाली उतरलेले असल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची शहादा डेपोची बस शहादा येथून प्रवाशांना घेऊन छत्रपती संभाजीनगरकडे निघाली होती. दुपारी चार वाजेच्या सुमारास चालक व वाहकाने बस पळसवाडी येथील आमपाली हॉटेलवर जेवणासाठी थांबवली. प्रवासी खाली उतरून काही वेळही झाला नव्हता, तोच बसमधून धूर निघू लागला आणि क्षणार्धात आगीने भीषण रूप धारण केले. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. हॉटेलवरील नागरिक आणि प्रवाशांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीच्या ज्वाला इतक्या तीव होत्या की काही वेळातच बसचे मोठे नुकसान झाले. प्रत्यक्षदर्शी प्रवाशांनी सांगितले की, आम्ही जेवणासाठी खाली उतरलो आणि काही वेळातच बसला आग लागली. ही घटना धावत्या बसमध्ये घडली असती तर मोठी जीवितहानी झाली असती. प्राथमिक माहितीनुसार लांबच्या प्रवासामुळे बसच्या इंजिनमध्ये मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण होऊन बस ओव्हरहीट झाली असावी. त्यामुळे शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे काही काळ हायवेवरील वाहतूक विस्कळीत झाली होती.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र एसटी महामंडळाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

(जाहिर प्रगटन)
(मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात)
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक. ९२ /२०२६
रंगु व ईतर विरुध्द निरंक
श्री.व्ही.एन. मस्के.

ज्यापेक्षा मुरलीधर पि. मारुती म्हस्के, हे दिनांक ०१/१०/२०२० रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१. रंगु भ्र. मुरलीधर म्हस्के, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, २. कविता भ्र. मुरलीधर म्हस्के, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, ३. जयश्री पि. मुरलीधर म्हस्के, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, ४. माया भ्र. सुरेश जगदाळे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, ५. कौलेश पि. मुरलीधर म्हस्के, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क अर्जदार नं. २ आई अर्जदार क्र १, २ व ५ यांचा पत्ता रा. सौताडा, ता. पाटोदा जि. बीड अर्जदार क्र ३ यांचा पत्ता रा. झोपडपट्टी ७२७, भगतसिंग नगर नं. ०३. लिंक रोड, ओप नगर, बस डेपो गोरेगांव वेस्ट मुंबई, मोतीलाल नगर मुंबई, महाराष्ट्र, ४००१०४ अर्जदार क्र ४ यांचा पत्ता रा. भारतील बौध्द वाचनालय जवळ, अशोक नगर, अकोट फैल, अकोला, महाराष्ट्र, ४४४००३ ज्याअर्थी, अर्जदार क्र १ ही मयताची पहिली पत्नी असून अर्जदार क्र २ ही मयताची दुसरी पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र ३ व ४ या मयताच्या व अर्जदार क्र १ यांच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्र ५ हा मयताचा व अर्जदार क्र २ यांचा मुलगा आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत मुरलीधर पि. मारुती म्हस्के, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक. २७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पु.ता.२४/०४/२०२६.

स्वाक्षरित
**क. लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर पाटोदा

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर
पाटोदा

# लातूर महानगरपालिकेची पहिलीच सभा वादळी

लातूर । प्रतिनिधी

लातूर शहर महानगरपालिकेच्या नवीन निवडणुकीनंतर आयोजित करण्यात आलेली पहिलीच विशेष सर्वसाधारण सभा कमालीची वादळी ठरली. सभा सुरू होण्यापूर्वीच नगरसचिवांच्या ढिसाळ कार्यपद्धतीमुळे सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही बाजूंच्या नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. कार्यक्रम पत्रिकेतील चुका, नियमांचे उल्लंघन आणि नियोजनाचा अभाव यावरून महापौरांसमोरच नगरसचिवांचे वाभाडे काढण्यात आले.



लातूर महानगरपालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. व्यासपीठावर उपमहापौर अँड स्नेहल उटगे, आयुक्त मानसी व नगरसचिव अश्विनी देवडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी महापौर सोनकांबळे यांनी स्वीकृत नगरसेवक पदासाठी नगरसचिवांकडे दाखल झालेल्या उमेदवारांच्या नावांचे वाचन केले व सात जणांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याचे त्यांनी घोषित केले. यामध्ये काँग्रेसचे पाच व भाजपाच्या दोघांचा समावेश आहे. या विशेष सभेत काँग्रेसचे माजी महापौर अ‍ॅड. दीपक सूळ यांनी सभेच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सभेची नोटीस सात दिवस आधी मिळालेली नाही, पत्रिकेवर खाडाखोड आहे आणि आऊटवर्ड नंबरचा पत्ता नाही. जर मी बेकायदेशीर बोलत असेल तर मला सभागृहाबाहेर काढा, अन्यथा नगरसचिवांवर एक रुपया दंडाची कारवाई करा, असे थेट आव्हान त्यांनी महापौरांना दिले. विषयाची टिपणी न मिळाल्याने नवीन सदस्यांना अभ्यास करता आला नसल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजप गटनेते अ‍ॅड. दीपक मठपती यांनी सभेच्या स्वरूपावर आक्षेप घेतला. महापौरांनी विषय सर्वसाधारण सभेत घेण्याचे निर्देश दिलेले असताना ते विशेष सभेत कसे आले? असा सवाल त्यांनी केला. भाजपचे २२ नगरसेवक अशा बेकायदेशीर कामकाजात सहभागी होणार नाहीत, असे स्पष्ट करत त्यांनी सभागृहात पाणी आणि ध्वनिक्षेपकाची व्यवस्था नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी गटनेत्यांना आणि नगरसेवकांना बसण्यासाठी जागा नसल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. नगरसचिवांना हे कायदेमंडळ आहे हे समजत नाही का?, असा सवाल करत त्यांनी दिलगिरीची मागणी केली. विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांनी तुमच्या चुकांचे परिणाम आम्ही का भोगायचे? अनुभवी सदस्यांचा हा अपमान आहे, अशा शब्दांत त्यांनीनगरसचिवांना सुनावले. भाजपचे नगरसेवक रविशंकर जाधव यांनी न्यायप्रविष्ट विषय सभेत आणून नगरसेवकांची पदे धोक्यात घालण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप केला. नगरसेविका शोभा पाटील यांनी सभापत्रिकेत नाव नसल्याने त्यांनी प्रशासकीय हलगर्जीपणावर बोट ठेवले. दरम्यान महिला बालकल्याणचा काही निधी परिवहसाठी खर्च केल्याच्या प्रशासनाच्या खुलाशावरुन सभागृहात सत्ताधारी व विरोधकांनी आक्षेप नोंदवला .यावेळी मोठा गोंधळ झाला यामुळे महापौरांनी १५ मनिटीसाठी सभा तहकूब केली. स्थायी समिती, परिवहन समिती गठीत करण्यात आली मा डीपीडीसी अंतर्गत शहर विकास कामाबाबत आक्षेप घेण्यात आला त्यावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामांचा दर्जा तपासावा व तोपर्यंत ती कामे स्थगित करावीत, असा निर्णय महापौरांनी दिला.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# नगरोत्थान योजनेअंतर्गत ११० कोटींची वाट लावणाऱ्या गुत्तेरालाच परत एकदा १९ कोटी रुपयांच्या कामांचे टेंडर

## टेंडर रद्द करण्याची पत्रकार संघाची मागणी अन्यथा १६ रोजी अमरण उपोषण

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरात यापूर्वी नगरोत्थान सुवर्ण जयंती शहरी विकास योजना अंतर्गत ११० कोटी रुपयांची अपूर्ण व निकृष्ट दर्जाची कामे करणा- या लातूर येथील श्रीनाथ इंजिनियर यांना परत एकदा परळी नगर परिषदेने डी.पी.डी.सी.२०२५०-२०२६ अंतर्गत १९ कोटी रुपयांची विविध विकास कामांचे दिलेले टेंडर त्वरित रदद करावे अन्यथा १६ मार्च रोजी परळी नगर परिषद कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने आज दिनांक ११ रोजी मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

परळी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आणि बांधकाम सभापतींनी शहरात यापुर्वीच झालेल्या कामाच्या ठिकाणी पुन्हा कामे टाकण्याचा घाट घातला जात असुन दि.११ मार्च रोजी १९ कोटी रुपयांच्या या कामांचे उद्घाटन करण्यात आले.सदरील कामे ही परळी शहराचे वाटोळे करणाऱ्या लातुरच्या श्रीनाथ इंजिनियर गुत्तेदारास देण्यात येवुन शासनाचा निधी हडप करण्याचा डाव उघडा पडला आहे.

परळी नगरपालिकेची निवडणूक होवुन दोन महिन्यांचा कालावधी उलटला असुन या पांच वार्षिक मध्ये परळी शहराचा विकास व्हावा या उद्देशाने राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी १७ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे.याबरोबरच धनंजय मुंडे यांच्या आमदार फंडातील अशा एकुण १९ कोटी रुपयांमध्ये नगरपालिकेच्या अध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी,बांधकाम सभापती पवन मुंडे व काही सभापतींनी शहरातील कामांचे



नियोजन करत ज्या ठिकाणी पुर्वीच रस्ते झालेले आहेत अशा अनेक ठिकाणी निधी टाकुण फक्त निधी लाटण्यासाठी उद्घाटनाचा घाट घातला गेला आहे.नगरपालिकेच्या अध्यक्षा आणि काही पदाधिकार्यांचे हे मनसुबे बहुतांश नगरसेवकांना पटले नसल्याने नाराजी व्यक्त करत उद्घाटन कार्यक्रमाकडे पाठ फिरविली.या १९ कोटी रुपयांमध्ये परळी शहरातील महात्मा बसवेश्वर चौकाजवळ अग्निशामक केंद्र बांधकाम करण्याचे काम दाखवण्यात आले असुन याठिकाणी सध्या कब्रस्थानचे काम सुरु आहे.तसेच पद्मावती गल्ली, सिध्देश्वर नगर भागातील ज्या रस्त्यांच्या कामासाठी निधी टाकलेला आहे त्या ठिकाणी यापुर्वीच रस्ते झालेले आहेत.१९ कोटींची ही कामे म्हणजे केवळ कागदोपत्री पुर्ण करुन निधी गुत्तेदाराच्या घशात घालण्याचा प्रकार होय.

शहर उखडुन टाकणार्या गुत्तेदारास पुन्हा काम

परळी शहरासाठी महत्वाकांक्षी असलेल्या भुयारी गटार योजनेसह इतर कामे असलेल्या लातुर येथील लड्डा या गुत्तेदाराने कामे पुर्ण करण्याऐवजी अर्धे परळी शहर उखडुन टाकुन नागरीकांसाठी समस्या निर्माण करणार्या या गुत्तेदारालाच ही १९ कोटींची कामे देवुन नगरपालिका पदाधिकार्यांनी परळी शहर पुन्हा भकास करण्याचा विडा उचलण्याची चर्चा होत आहे .

२५ नगरसेवकांचा कार्यक्रमावर बहिष्कार

नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी आणि बांधकाम सभापती ◀◀ पान ३ वर

# वडवणी पोलीस ठाण्यात गंभीर प्रकार, तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ

## पीआय वर्षा व्हगाडे व तांदळे यांच्यावर कारवाईची वंचित बहुजन आघाडीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**वडवणी पोलीस स्टेशन अंतर्गत एका गंभीर प्रकरणात तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे व पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, खंडोबाची वाडी (ता. वडवणी, जि. बीड) येथील एका व्यक्तीची पत्नी त्याच्या भाच्याने पळवून नेल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर त्या महिलेसोबत संबंधित व्यक्तीच्या दोन मुलींनाही जबरदस्तीने घेऊन गेल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पीडित व्यक्ती वडवणी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी गेला असता, पोलिसांनी त्याची तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याच प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे यांनी पळून गेलेल्या महिलेशी फोनवर संपर्क साधल्याची कॉल रेकॉर्डिंग समोर आली असून त्यामध्ये पोलिस स्टेशनला लवकर ये, त्यांनी अर्ज दिला आहे, तुझा जबाब घ्यायचा आहे असे सांगितल्याचे बोलणे ऐकू येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे पोलिसांकडून तक्रारदाराला मदत करण्याऐवजी पळून गेलेल्या महिलेलाच मदत केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

तसेच तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, तो पोलीस स्टेशनमध्ये गेला असताना त्याला मानसिक त्रास देत तेथून हाकलून लावण्यात आले. या प्रकरणात पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे यांचाही सहभाग असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य सदरक्षणाय खलनिग्रहणाय असताना, अशा प्रकारे पीडिताला न्याय नाकारल्याचा आरोप होत असल्याने पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (उउऋ) तपासण्याची तसेच पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे व संबंधित कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पीडित व्यक्तीची तक्रार तात्काळ नोंदवून घेऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

# पदोन्नती कृती समितीचे जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण

## शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख पदोन्नती तात्काळ देण्यात याव्यात

बीड । प्रतिनिधी

शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ग्रेड मुख्याध्यापक (प्रा.) पदोन्नती तात्काळ देण्यात यावी, या मागणीसाठी पदोन्नती कृती समितीच्या वतीने बीड जिल्हा परिषदेसमोर बुधवारी साखळी उपोषण सुरू केले आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक (प्रा.) व प्राथमिक पदवीधरपदी पात्र शिक्षकांना नियमाप्रमाणे पदोन्नत्ती प्रक्रिया राबवुन समुपदेशनाने तात्काळ पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासन केंद्रप्रमुख (समुह साधन केंद्र समन्वयक) अधिसूचना सेवा प्रवेश नियम २०२५, सर्वोच्च न्यायालय निर्णय दि. १ सप्टेंबर २०२५, अव्वर सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि. २९/०१/२०२६, शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि ९ सप्टेंबर २०२६ नुसार पदोन्नती कृती समिती मार्फत बुधवार दि. ११ मार्च पासून जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

१) केंद्रप्रमुख अधिसूचना सेवा प्रवेश नियम २०२५ मधील तरतुदी व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार / उत्तीर्ण पात्र शिक्षकांना तात्काळ केंद्रप्रमुख पदी पदोन्नती देण्यात यावी. २) केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी प्रसिध्द केलेल्या यादीवर आलेल्या आक्षेपांची तात्काळ प्रत्यक्ष सुनावणी घेवून सुधारित यादी प्रसिध्द करण्यात यावी, ३) केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रीयेत अपात्र उमेदवारांचा समावेश करण्यात येवू नये. ४) केंद्रमुख पदोन्नती प्रक्रिया समुपदेशनाव्दारे तात्काळ राबविण्यात यावी. ५) संच मान्यता २०२५-२६ मुळे अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना जिल्ह्याबाहेर जाण्याची वेळ येऊ नये, आदी मागण्यासाठी साखळी उपोषण सुरू केले आहे.सकाळी उपोषणात पदोन्नती कृती समितीचे सुभाष सारूक, मुकुंद घोडके आणि त्याचे सहकारी सहभागी झाले आहेत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट जागीच ठार

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी शिवारात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डी वर बुधवारी (दि.११) दुपारी सुमारे सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत एक काळवीट गंभीर जखमी झाले. मुळुकवाडी येथील सुखदेव वाणी व ग्रामस्थांनी जखमी काळवीटाला पाणी पाजून त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला; मात्र गंभीर दुखापत झाल्याने काही वेळातच त्याचा मृत्यू झाला.



घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. काळवीट मृत्यूमुखी पडल्याची माहिती त्यांनी फोनद्वारे वनरक्षक महेश मेटे यांना दिली तसेच वनकर्मचारी तातडीने पाठविण्याची विनंती केली. राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी वर हरिण व काळवीट अज्ञात वाहनांच्या धडकेत जखमी होण्याच्या किंवा मृत्यूमुखी पडण्याच्या घटना वाढत आहेत. गेल्या महिन्यातही याच मुळुकवाडी शिवारात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या हरिणाला ग्रामस्थांच्या मदतीने वाचविण्यात यश आले होते. मात्र यावेळी काळवीटाचा जागीच मृत्यू झाला. या ठिकाणी वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी सावधानतेचे फलक लावावेत व वाहनचालकांना वेग मर्यादा पाळण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.



# योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बनवले एलईडी स्क्रीन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील प्रथम वर्षात शिकणाऱ्या संगणक अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध प्रयोगशाळेत प्रा.निशांत मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली एलईडी स्क्रीन ची निर्मिती केली आहे. एलईडी स्क्रीन तंत्रज्ञानाच्या जलद प्रगतीमुळे विविध उद्योगांमध्ये माहिती वितरण आणि दृश्य अनुभवांसाठी उत्कृष्ट साधने उपलब्ध झाली आहेत. याच तंत्रज्ञानाच्या वापर करून एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध ◀◀ पान ३ वर

# सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व प्रश्नांवर आढावा

### महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागर यांची बीडमध्ये बैठक

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंह डागोर यांनी बीड येथे भेट देत सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेचा तसेच त्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलिस उपअधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच नगरपरिषद प्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत लाड पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सफाई कामगारांच्या पदोन्नती, वेतनवाढ, सेवा अटी, रजा रोखीकरण आदी मुद्द्यांवरही सविस्तर आढावा घेण्यात आला.

सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या श्रमसाफल्य आवास योजना, सफाई मित्र सुरक्षा अभियान यांसारख्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन भरती प्रक्रियेबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध असून त्यांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.



# पाणी बचतीतून वृक्षारोपणाचा नवा प्रयोग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उन्हाळ्याच्या दिवसातही जयहिंद ग्रूपची वृक्षारोपणाची चळवळ चालूच असून पाणी बचतीतून वृक्षारोपण या नव्या प्रयोगाव्दारे दोन बाय दोन बाय चा खड्डा खोदला त्यात दोन टोपले वाळू टाकली खड्डुयात लावले जाणाऱ्या वृक्षा इतक्या आकाराचा उंच पाईप ◀◀ पान ३ वर

# लाडकी बहिण योजनेच्या नावाखाली महिलांना फसवणाऱ्या ठगाला अटक

बीड । प्रतिनिधी

महिलांना फोन करून तुम्ही लाडक्या बहिणी योजनेच्या लाभार्थी असल्याने तुमची शासनाने विशेष लाडकी बहीण म्हणून निवड झालेली आहे या माध्यमातून तुम्हाला पिठाची गिरणी, शिलाई मशीन व भांड्याचे किट मिळणार आहे. त्यासाठी ट्रान्सपोर्ट चे भाडे म्हणून अगोदर ऑनलाईन भाड्याचे पैसे द्यावे लागणार आहेत. तसेच फोन पे वर २५०० रुपये पाठवा, मी समाज कल्याण अधिकारी बोलत आहे. यावर विश्वास ठेवून पिंपळवंडी तालुका पाटोदा येथील पाच महिलांनी मिळून ९ हजार रुपये जमा करून पाठविले. सदर रक्कम पाठवूनही सदरील वस्तू व कीट आलेले नसल्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सदर महिलेने अंमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध दि १५/२/२०२६ रोजी तक्रार दिली होती.



त्याप्रमाणे अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नी. भार्गव सपकाळ यांच्या मार्गदर्शनात तपासाची चक्रे वेगाने फिरली.या गुन्ह्यातील महिलांना फसवणारा ''ठग'' हा गोरक्षनाथ नवनाथ पन्हाळकर रा. नाळवंडी तालुका पाटोदा (ह.मू. तळेगाव, बीड.) निष्पन्न होतास त्यास अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नी. भार्गव ◀◀ पान ३ वर

# ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांना स्मृती दिनानिमित्त संघर्षभूमीवर अभिवादन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

आद्यशिक्षिका व समाजपरिवर्तनाच्या लढ्यात आयुष्य अर्पण करणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त अंबाजोगाई येथील संघर्षभूमीवर त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. ◀◀ पान ३ वर

# तहसीलदारसाहेब, मंजरथ घाटाकडे दुर्लक्ष का ?

## माजलगाव मंजरथ घाटावर गोदावरी नदीपात्राची खुलेआम चाळण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मंजरथ १ घाटावर गोदावरी नदीपात्रात केनी, पोकलेन,जेसीबी व हायवा व ट्रॅक्टरच्या साह्याने खुलेआम सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामागे हप्तेखोरीचा प्रकार असल्याची जोरदार चर्चा आहे. महसूल प्रशासन व पोलीस गोदावरी नदीपात्रात खुलेआम चालणाऱ्या वाळू उपशावर कारवाई न करता हप्ता गोळा केला जात असल्यामुळेच वाळू माफिया, केनी, पोकलेन व बिनधास्त अवैध वाळू उत्खनन सुरू केले असून असा सवाल उपस्थित झाला आहे. जर महसूल प्रशासन व पोलीस हप्तेखोरीत सक्रिय असतील, तर ? हे की संपूर्ण यंत्रणाच या काळ्या धंद्याला संरक्षण देत आहे, असा रोखठोक आरोप आता उघडपणे केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे

कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन असताना माजलगाव च्या मंजरथ १घाटावर वाळू माफियांचा उच्छाद कसा ?

कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन असताना माजलगाव च्या ◀◀ पान ३ वर



# घरगुती गॅस सिलेंडरच्या व्यावसायीक वापरामुळे गॅसची टंचाई

बीड । प्रतिनिधी

सर्वसामान्य जनतेचे गॅस टंचाईमुळे हाल होऊ नयेत यासाठी केंद्र सरकारने एस्मा कायदा लागू केलेला आहे मात्र बीडमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यवसायासाठी सर्रास केला जात असल्याने गॅसची कृत्रिम टंचाई होत असून अनेक कुटुंबांना वेळेवर गॅस मिळत नाही. अशा तक्रारी आहेत. होणारी काळाबाजारी कधी रोखली जाणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

जग एकीकडे इंधन टंचाईमुळे त्रस्त आहे. अशावेळी जनतेला घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध व्हावा यासाठी केंद्र सरकारने कडक पावलं उचलली आहेत. व्यावसायिक गॅस सिलेंडरवर बंधन आणल्यामुळे सध्या तरी जनतेला घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध होऊ लागला आहे. इराण युद्धामुळे आणखी किती दिवस इंधन टंचाई जाणवेल याचा अंदाज बांधणं अवघड झालेलं आहे अशावेळी



पेट्रोकेमिकल विभागातून गॅस वळवल्यामुळे दैनंदिन वापराच्या गॅस ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# अजितदादांच्या अपघाती निधनानंतर बारामतीच्या पोटनिवडणुकीची तयारी सुरु; अंतिम मतदार यादीही जाहीर, कधी होणार निवडणूक?

**बारामती । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पोटनिवडणुकीची (लू-शश्रशलींळेप) तयारी सुरू झाली आहे. याचाच पहिला टप्पा म्हणून बारामती विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी झाली आहे. त्यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. प्राप्त अर्जांची छाननी करून आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादीत पुरुष मतदारांची संख्या १ लाख ९३ हजार ४९६, महिला मतदारांची संख्या १ लाख ९० हजार २७१, तर इतर मतदारांची संख्या २४ असून एकूण मतदारसंख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी आहे. बारामती विधानसभेची पोटनिवडणूक कधी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे. मात्र प्रशासनानं तयारी सुरू केली आहे.

अजितदादांची बारामती सुनेत्रा पवारच सांभाळणार

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी २०२६पर्यंत नाव नोंदविलेले मतदार पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. तर बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा उमेदवार ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढणार असल्याची माहिती काही दिवसांपूर्वी समोर आली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत



पोटनिवडणूक लढण्यावर एकमत झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.

सुनेत्रा पवार यांचा परिचय

सुनेत्रा पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी तेर (जि. धाराशिव) याठिकाणी झाला. माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांची बहीण असलेल्या सुनेत्रा पवार यांना राजकीय वारसा जन्मतःच लाभलेला होता. १९८५ मध्ये त्यांचा विवाह अजित पवार यांच्यासोबत झाला. लग्नानंतर काटेवाडी (ता. बारामती) येथे आल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवात केली. काटेवाडीमध्ये ग्रामस्वच्छता चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. अगदी पहाटे पासून स्वतः हातात खराटा घेऊन कामाला सुरुवात करणाऱ्या सुनेत्रा पवार यांनी संपूर्ण गावालाच या अभियानात सहभागी केलं. त्यांच्या या प्रेरणेतून ग्रामस्वच्छता अभियानात काटेवाडी राज्यात प्रथम क्रमांकावर आलं. या कार्याची दखल घेत देश-विदेशातून अभ्यासकांनी काटेवाडीला भेट दिली. याच कामामुळं सुनेत्रा पवार यांना सार्क देशांच्या साकोसान परिषदेत सहा राष्ट्रप्रमुखांसमोर भाषण करण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या सामाजिक कार्याला सुरूवात झाली.

बारामतीमध्ये 'एनव्हायर्नमेंट फोरम ऑफ इंडिया'च्या माध्यमातून मोतीबिंदू शस्त्रक्रिया, वृक्षारोपण, ओढा खोलीकरण, महिलांमध्ये कर्करोगाविषयी जागृती आदी उपक्रम सुनेत्रा पवारांनी राबवले. या सर्व उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय आणि नेतृत्वात्मक सहभाग राहिला. बारामती टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून त्यांनी हजारो महिलांना रोजगार मिळवून दिला.

घरापासून राजकारणापर्यंत अजित पवारांना दिली साथ

लग्नानंतर अजित पवार यांच्यासोबत शेतकाम, पोल्ट्री व्यवसाय ते गाईगुरे सांभाळणे, दूध काढणे अशी सर्व कामं सुनेत्रा पवार यांनी आवडीने केली. अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीत आपली घरं सांभाळणे, नातेसंबंध जपणं, सामाजिक कार्य करणं, कठीणप्रसंगी दादांना साथ देणं आणि सल्लामसलत करणं, ही जबाबदारी त्यांनी पार पडली. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच त्यांच्या नावावर आज पहिली महिला उपमुख्यमंत्री असा एक मोठा विक्रम होणार आहे. या आधी कोणत्याही महिलेने या पदावर काम केलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा प्रत्यक्षामध्ये राजकारणात प्रवेश झाला. त्यापूर्वी पवार कुटुंबातील प्रत्येक निवडणुकीवेळा त्या उत्साहाने प्रचारात उतरत असत आणि बारामतीमध्ये आत्तापर्यंत मिळालेल्या अनेक विक्रमी विजयांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला. पक्षफुटीनंतर सुप्रिया सुळेंविरोधात त्या लोकसभा निवडणुकीत उतरल्या आणि त्यांना पराभव पत्करावा लागला, यानंतरही त्या खचल्या नाहीत.त्या जनसेवेत सक्रिय राहिल्यानंतर त्यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. राज्यसभा खासदार म्हणून काम करत असतानाच त्यांना तालिका अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली आणि देशाच्या सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्ष आसनावर विराजमान होण्याचा मान मिळाला. आता अजित पवारांच्या निधनानंतर त्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.


सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राजभवन येथे झालेल्या एका कार्यक्रमात राज्यपालांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या आहेत.

तर कलम १६४(४) : भारतीय संविधानानुसार कोणतीही व्यक्ती राज्याच्या विधिमंडळाची सदस्य नसतानाही मंत्री (उपमुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्री) म्हणून नियुक्त होऊ शकते. मात्र, हे पद टिकवून ठेवण्यासाठी, शपथ घेतल्यापासून सलग सहा महिन्यांच्या आत त्या व्यक्तीला विधानसभा किंवा विधान परिषदेचे सदस्य होणे अनिवार्य असते. जर ते या कालावधीत सदस्य झाले नाहीत, तर त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. त्यामुळे आता बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीमध्ये सुनेत्रा पवार लढणार असल्याची माहिती आहे.

## पुण्यात थट्टा मस्करी जीवावर बेतली, किरकोळ वादातून मित्रांचाच खून; पोलिसांकडून ४ जणांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याची सांस्कृतिक नगरी असलेल्या पुणे (झींपश) शहरात गुन्हेगारी, खून, अवैध धंद्याचे प्रमाण वाढत आहे. नुकतेच पुण्यात एका तरुणाची निर्घुण हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली असून हत्या करतानाच्या घटनेचा उउढत व्हिडिओ देखील व्हायरल झाला आहे. पुण्यातील कॅम्प परिसरात किरकोळ वादातून मारहाण आणि हत्येचा प्रकार घडल्याची माहिती आहे. मयत आणि आरोपी हे दोघेही मित्र असून काल दोघांमध्ये कॅम्प परिसरात किरकोळ वाद झाला. त्यानंतर, दोघांमध्ये वाद झाला आणि सहा जणांनी मयत तरुणावर वार करत त्याची हत्या केली. याप्रकरणी,




पोलिसांनी (झेश्रळलश) आत्तापर्यंत एकूण ४ आरोपींना ताब्यात घेतलं असून अधिक तपास सुरू आहे.

फैसल फारुख खान असं हत्या झालेल्या तरुणाचं नाव असून आरोपी शाहबाज शेख याच्यासोबत त्याचा वाद झाला होता. या किरकोळ वादानंतर दोघांमध्ये मारहाण झाली आणि शाहबाजच्या इतर काही मित्रांनी एकत्र येत फैसलला धारदार शस्त्राने मारले, त्यात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी, बजाद अली सय्यद, अली अब्बास अश्रफअली सय्यद, सोहेल युसुफ तांबोळी, शाहबाज चांद शेख, तालिब अली सय्यद, अश्रफली सय्यद यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चार जणांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी शहबाज शेख, याची मयत फैसल खान याने थट्टा मस्करी केली, त्याचा राग आल्याने शाहबाज याने मयताच्या कानाखाली चापट मारली. त्यातूनच दोघांमध्ये वाद झाल्याने, शहबाज शेख व त्याच्या बाकीच्या साथीदारांनी धारधार चाकुने फैसल खानच्या छातीत, पाठीत, हातावर, आणि डोक्यात वार करत त्याची हत्या केली. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. त्यामध्ये, भररस्त्यात आजुबाजूला माणसं असतानाही ही मारहाणीची घटना घडत असल्याचे दिसून येते. दरम्यान, काहींनी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केल्याचंही पाहायला मिळत आहे

## पुणे अन् पिंपरी चिंचवडकरांना मिळाले नवे सनदी अधिकारी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या (ख-ड) बदल्या करण्यात आल्या असून पिंपरी चिंचवड महापालिकेला आता कायमस्वरुपी आयुक्त मिळाले आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी आयुक्त पदावर विजय सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी विजय सूर्यवंशी हे मुंबई (चींलरळ) कोकण विभागाचे विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांच्यासह आणखी दोन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या (ढीरपीषशी) करण्यात आल्या असून बापू पवार आणि महेश आव्हाड यांचीही बदली करण्यात आली आहे. आज ११ मार्च रोजी



या तिन्ही अधिकाऱ्यांचा बदली आदेश जारी करण्यात आला आहे.


डॉ. विजय सूर्यवंशी हे २००६ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून सध्या ते कोकण विभाग, मुंबई येथे विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. आता, त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका महानगरपालिका आयुक्त, येथे नियुक्ती देण्यात आली आहे. तर, बापू पवार यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई येथे नियुक्त करण्यात आले आहे. यापूर्वी ते राज्याच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचे सहसचिव म्हणून कार्यरत होते. बापू पवार हे २०१५ चे ख-ड अधिकारी आहेत. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश आव्हाड यांना पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड येथे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. महेश आव्हाड हेही २०१५ च्या बॅचचे आयएएस आहेत. त्यामुळे, मुंबईतील दोन अधिकाऱ्यांना पुण्यात पाठवण्यात आलं आहे. दरम्यान, अखेर पिंपरी चिंचवड महापालिकेला कायमस्वरूपी आयुक्त लाभले. आयुक्त म्हणून विजय सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आलीये. सूर्यवंशी सध्या कोकणचे विभागीय आयुक्त म्हणून काम पाहत होते. तर श्रावण हर्डीकर हे पिंपरी चिंचवड पालिकेचे प्रभारी आयुक्त होते. आता हर्डीकर यांच्या जागी पूर्णवेळ आयुक्त म्हणून सूर्यवंशी कामकाज पाहतील. लवकरचं ते आयुक्तपदाची सूत्र हाती घेतील.

## दहावीचे गणिताचे पेपर लीक?; पुणे बोर्डाकडून पोलिसांत धाव

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या सुरू असलेल्या परीक्षेत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गणिताचे दोन्ही पेपर परीक्षा होण्यापूर्वीच चक्क एका टेलिग्राम ग्रुपवर लीक झाले असून, याप्रकरणी बोर्डाच्या पुणे विभागीय मंडळाने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

विशेष म्हणजे यातील एक पेपर तीन दिवस अगोदरच टेलिग्राम ग्रुपवर टाकण्यात आला होता. त्यानुसार टेलिग्राम ग्रुप ॲडमिन आणि त्यातील सदस्यांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुणे विभागीय मंडळाचे सहाय्यक अधीक्षक चंद्रकांत




वैजनाथ जेवळीकर यांनी फिर्याद दिली आहे. जेवळीकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ९ मार्च २०२६ रोजी बोर्डाच्या अधिकार्यांना एका संशयास्पद टेलिग्राम लिंकची माहिती मिळाली.जेव्हा बोर्डाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी या ग्रुपची तपासणी केली, तेव्हा संशयास्पद बाबी आढळून आल्या. ६ मार्च रोजी होणारा गणित भाग-१ चा पेपर ५ मार्चला रात्री ८ वाजून ३७ मिनिटांनी या ग्रुपवर टाकण्यात आला होता, तसेच ९ मार्च रोजी झालेला गणित भाग-२ चा पेपर तर चक्क ६ मार्चला दुपारी ४ वाजून ५६ मिनिटांनी म्हणजेच तीन दिवस आधीच या ग्रुपवर उपलब्ध करून देण्यात आला होता. या टेलिग्राम ग्रुपवर आलेले पेपर आणि बोर्डाने अधिकृतपणे काढलेले पेपर यांची जेव्हा प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली, तेव्हा ते दोन्ही पेपर अगदी सारखेच असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे परीक्षेची गोपनीयता पूर्णपणे मोडीत निघाल्याचे समोर आले आहे. या सर्व प्रकारामुळे राज्य शिक्षण मंडळाने तातडीने पावले उचलत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा पेपर नेमका कोठून लीक झाला, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

## एआय भारताच्या भविष्यास आकार देणार: संजय सेठ

**पुणे । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय भारताच्या भविष्यास आकार देण्यात आणि जागतिक स्तरावर देशाची प्रतिमा अधिक मजबूत करण्यात मोठी भूमिका बजावेल. आजच्या तरुणांसाठी 'एआय' हे एक महत्त्वाचे क्षेत्र बनले असून, आरोग्यसेवा, शेती, शहरी व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थेसारख्या अन्य अनेक क्षेत्रांच्या विकासात ते साहाय्यक ठरेल, हे नुकत्याच दिल्लीत झालेल्या 'एआय समिट'ने सिद्ध केले आहे. त्यामुळे एआय नोकऱ्या काढून घेईल या भीतीतून बाहेर पडण्याची गरज असल्याचे मत केंद्र सरकारचे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी व्यक्त केले.

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) येथे शनिवारी संस्थेचा १६ वा पदवीप्रदान समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सेठ बोलत होते. या वेळी चॉईस एएमसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीष जैन व ग्रॉण्ट थॉम्पसन एलएलपीचे अंकित चुग हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी पीआयबीएमचे संस्थापक अध्यक्ष रमणप्रीत यांनी सर्वांचे स्वागत केले.सेठ म्हणाले, देश २०४७ कडे म्हणजे स्वातंत्र्याच्या १०० वर्षांच्या दिशेने वाटचाल करत असताना आजचे तरुण हेच विकसित भारताचे खरे बँड म्बेसेडर आहेत. भारतात ३० वर्षांखालील ६० कोटींहून अधिक तरुण लोकसंख्या आहे, जी देशाची मोठी ताकद आहे. तरुणाइ स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आधीपासूनच नवकल्पना आणि आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

## पुण्यातील लोकमान्य टिळकांचे वारसदार शिवसेनेत प्रवेश करणार?

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात मोठी राजकीय घडामोड घडण्याची शक्यता आहे. काँग्रेस नेते आणि टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक यांनी लवकरच शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची घोषणा केली आहे. त्यासाठी ते काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



माध्यमांशी बोलताना रोहित टिळक यांनी सांगितले की, सुमारे तीन वर्षांपूर्वी त्यांच्या संस्थेमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मानाचामानाचा टिळक पुरस्कार देण्यात आला होता. या घटनेनंतर काँग्रेस नेतृत्वाने त्यांच्याशी काहीसे अंतर ठेवण्यास सुरुवात केली. या संदर्भात त्यांनी अनेकदा पक्षाच्या हायकमांडपर्यंत आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यातून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. दरम्यान, याच काळात त्यांची आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची चर्चा झाली. शिंदे यांच्यात सर्वांना सोबत घेऊन जाण्याची क्षमता आणि कार्यकर्त्यांना बळ देणारा नेता दिसल्यामुळे शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे रोहित टिळक यांनी सांगितले. रोहित टिळक यांनी पुढे सांगितले की, त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत शिंदे यांनी त्यांना राज्य सभा उमेदवारी देण्याची ऑफर दिली होती. मात्र महाविकास आघाडीकडून शरद पवार यांना उमेदवारी देण्यात आल्याने त्यांनी माघार घेतली. शरद पवार यांच्या दीर्घ राजकीय अनुभवाचा आणि टिळक कुटुंबाशी असलेल्या स्नेहाचा विचार करून आपण राज्यसभेच्या निवडणुकीतून अर्ज न भरण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आता राज्यसभा निवडणूक हुकल्यानंतर एप्रिल महिन्यात होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीत रोहित टिळक यांना संधी मिळते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## रोहित पवारांनी घेतली नितीन गडकरींची भेट, दोन प्रकल्पास अजित पवारांचं नाव देण्याची मागणी, अपघातावरही चर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. बारामतीमधील विमान अपघात हा घातपात होता की अपघात असा संशय अनेकांना वाटतो. त्याच पार्श्वभूमीवर या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांकडून करण्यात आली आहे. दुसरीकडे डीजीसीएच्या अहवालावर आक्षेप घेत आमदार रोहित पवार यांनी काही प्रेझेंटेशन दाखवून व्हिसीआर कंपनीच्या मालकांचे नागरी उड्डाणमंत्र्यांशी थेट संबंध असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे म्हटले. त्यामुळे, अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा संसदेत उपस्थित करावा, अशी मागणी करत त्यांनी दिल्लीत बड्या नेत्यांची भेट घेतली. त्याच पार्श्वभूमीवर ते आज केंद्रीयमंत्री



नितीन गडकरी यांनाही भेटले.

संसदेच्या अधिवेशनात अजित दादांच्या अपघाताच्या पारदर्शक चौकशीसाठी खा. सुप्रियाताईंच्या मदतीने आम्ही इंडिया आघाडीतील सर्व नेत्यांना भेटून पाठपुरावा करत आहोत. काँग्रेससह इंडिया आघाडीतील सर्वच पक्ष हे पारदर्शक चौकशीची मागणी करणार आहेत, असे रोहित पवार यांनी म्हटले. रोहित पवार यांनी काल काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतली होती. त्यानंतर, आज त्यांनी भाजप नेते तथा केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासाच्या अनुषंगाने चर्चा केली. गडकरी साहेबांचे आणि अजित दादांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. 'कामाचा माणूस' हे या दोन्ही व्यक्तिमत्त्वामधील साम्य आहे. दिल्लीत आज गडकरींची भेट घेऊन पुणे रिंग रोड, तळेगाव-चाकण-शिक्रापूर उन्नत महामार्ग यासह पुणे-शिरूर उन्नत महामार्गास स्व. अजित दादांचे नाव देण्याची विनंती केली. एखाद्या विकास प्रकल्पाला किंवा वास्तूला नाव दिल्यानंतर दुसरं नाव देणं हे योग्य ठरणार नाही. त्यामुळे संबंधित प्रकल्पाची उभारणी होत असतानाच त्यामागे मेहनत असलेल्या व्यक्तिमत्त्वाचं नाव देणं हे अधिक योग्य ठरेल. गडकरी साहेबांनी यासाठी एक प्रक्रिया असल्याचे सांगत त्या प्रक्रियेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करून पाठपुरावा करण्याचा शब्द दिला, अशी माहिती रोहित पवारांनी या भेटीनंतर दिली. दरम्यान, रोहित पवार यांनी काँग्रेसचे राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ विधीज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांचीही दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात भेट घेऊन अजितदादांच्या संशयास्पद विमान अपघातासंदर्भात त्यांच्याशी सल्लामसलत केली. याबाबत आम्ही जमा केलेल्या माहितीची कागदपत्रेही त्यांना दिली. त्यांनीही यासंदर्भात आम्हाला मोलाचं मार्गदर्शन केलं.

## मिशन लक्ष्यवेध कुस्ती योजनेवर महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचा आक्षेप

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मिशन लक्ष्यवेध' कुस्ती निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र योजनेवर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने गंभीर आक्षेप घेतले आहेत. ही योजना चुकीच्या पद्धतीने आणि कुस्तीगीर संघाला विश्वासात न घेता राबविली जात असल्याचा आरोप करीत संघाने ६ एप्रिल रोजी राज्यव्यापी 'थाळीनाद' आंदोलनाचा इशारा दिला आहे.



याबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी क्रीडा आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात योजनेतील अनेक त्रुटी मांडल्या आहेत. शासनाच्या नियोजनानुसार १० वजनी गटांत केवळ २० कुस्तीगीर निवडले जाणार आहेत. मात्र, कुस्तीमध्ये सरावासाठी जोडीदाराची आवश्यकता असते. दुखापतींमुळे १५-२० टक्के खेळाडू विश्रांतीवर असतात. अशा वेळी मोजक्या खेळाडूंमुळे सराव करणे अशक्य होईल. यामुळे दर्जेदार कुस्तीगीर या योजनेत सहभागी होणार नाहीत आणि केवळ कागदोपत्री अंमलबजावणी होऊन शासनाच्या पैशाचा अपहार होईल, अशी भीती व्यक्त केली आहे.

ही योजना केवळ 'फ्री-स्टाईल' कुस्तीसाठी मर्यादित असून, ग्रीको-रोमन आणि महिला कुस्तीगिरांबाबत यात स्पष्टता नाही. प्रशिक्षक आणि आहाराचा दर्जा काय असेल, याबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत.

आंदोलनाचा पवित्रा

'शासनाने या योजनेचे सध्याचे नियोजन त्वरित स्थगित करून कुस्तीगीर संघासोबत चर्चा करावी,' अशी मागणी भोंडवे यांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास ६ एप्रिल रोजी राज्यातील सर्व जिल्हा क्रीडा कार्यालयांसमोर थाळीनाद आंदोलन केले जाईल आणि क्रीडामंत्री व क्रीडा आयुक्तांचा निषेध केला जाईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.